म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १७६८७

# साहित्य पराग

कृ. ब. निकुम्ब
गो. म. कुलकर्णी

REFBK 0014059
REFBK-0014059

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ..... ७९५८१ ..... वि: ..... काव्य .....
क्रमांक ..... १७६८ ..... नों: दि: ..... ७।९।६८

# साहित्य - पराग

संपादक

कृ. ब. निकुम्ब

गो. म. कुलकर्णी

मूल्य अडीच रुपये

प्रकाशक : प्रा. अरविंद मंगरूळकर
चिटणीस
महाराष्ट्र-साहित्य-परिषद
टिळक-रस्ता, पुणे-२

प्रथमावृत्ती :
ऑगस्ट, १९६४

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
' शिव-पार्वती '
४६१।४ सदाशिव, पुणे-२

महाराष्ट्र-साहित्य-परिषद
टिळक-रस्ता, पुणे-२

'साहित्य-पराग' हा कवितासंग्रह प्रा. कृ. ब. निकुम्ब आणि प्रा. गो. म. कुलकर्णी यांनी महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या आदेशानुसार तयार केला आहे. प्रस्तुत संग्रहात ज्ञानदेवांपासून अगदी आधुनिक कवींपर्यंत जी काव्यनिर्मिती झाली, तिचे धावते दर्शन घडावे, अशी सर्वसाधारण योजना केली आहे. या योजनेत येणारा कालखंड हा अनेक शतकांचा आहे. त्यामुळे त्यातील काव्यस्वरूपाचे आकलन समग्रतेने अथवा अपेक्षित भरवोसपणाने कदाचित होणार नाही; परंतु त्या काव्याची गुणवत्ता, वैशिष्ट्ये, बलाबल, मर्यादा, भाषशैली, बदलते स्वरूप, जाणिवा ही सर्व यथायोग्यपणे चित्तात ठसावी, हे धोरण मात्र अवलंबिलेले जाणवेल, अशी उमेद आहे. हे धोरण प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रा. कृ. ब. निकुम्ब आणि प्रा. गो. म. कुलकर्णी यांनी जे परिश्रम केले, त्यांबद्दल मी त्यांचे परिषदेच्या वतीने मनापासून आभार मानितो.

या प्रयत्नात पुढील कविजनांचा आणि कविजनांच्या हक्कदारांचा विशेषत्वाने निर्देश करावयास पाहिजे. कारण परिषदेवरील लोभाने त्यांनी आपल्या कविता येथे संगृहीत करण्यास परिषदेला परवानगी दिली, आणि त्यामुळेच या संग्रहाच्या प्रयत्नाला मूर्त रूप आले. या सर्वांचे मी परिषदेच्या वतीने हार्दिक आभार मानितो, आणि असाच लोभ त्यांनी निरंतर ठेवावा, अशी विनंती करितो.

हे कविजन आणि हक्कदार असे :

आ. रा. देशपांडे, य. दि. पेण्डरकर, प्र. के. अत्रे, रा. श्री. जोग, बा. भ. बोरकर, वि. वा. शिरवाडकर, वा. ग. कान्त, इंदिरा संत, वि. म. कुलकर्णी, कृ. ब. निकुम्ब, मंगेश पाडगावकर, वसंत बापट.

नेर्लेकर बुकसेलर्स (गोविंदाग्रज), पार्वतीबाई ठोमरे (बालकवी), भा. चं. गोऱ्हे (चंद्रशेखर), म. भा. तांबे, (भा. रा. तांबे), व्हीनस प्रकाशन (माधव जूलियन) आणि अंजना मर्ढेकर (बा. सी. मर्ढेकर).

अरविंद मंगरूळकर
चिटणीस
महाराष्ट्र-साहित्य-परिषद
पुणे

१५ ऑगस्ट, १९६४

महाराष्ट्र - साहित्य - परिषदेच्या आदेशानुसार 'साहित्य - पराग' हे संकलन आम्ही तयार केले आहे. विद्यार्थ्यांना सरस काव्याचा परिचय व्हावा, हे आमच्या संकलनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्या अनुरोधाने प्राचीन आणि अर्वाचीन साहित्यातील काव्यमय, परंतु विद्यार्थ्यांच्या आटोक्यात येतील, अशा वेच्यांची निवड केली आहे. या निवडीला अपरिहार्यपणे काही मर्यादा पडलेल्या आहेत. महोदार मराठी काव्यसारस्वताच्या दर्शनाची प्रेरणा निर्माण करणे हे या संकलनाचे साध्य.

बेळगाव
१ ऑगस्ट, १९६४

क. ब. निकुम्ब
गो. म. कुलकर्णी

क्रमणी

## १. प्राचीन कविता


| | | | |
|---|---|---|---|
| १ | आम्ही भावांचे पाहुणे | ज्ञानदेव | १ |
| २. | तंव देखीन्निली राजधानी याद्वां ची | भास्करभट बोरीकर | ३ |
| ३. | म्हणे नामयाची जनी | जनाबाई | ४ |
| ४. | सगुणचरित्रें | एकनाथ | ६ |
| ५. | जागल्या | एकनाथ | ७ |
| ६. | चिन्हें दाऊनियां ऐशीं | मुक्तेश्वर | ८ |
| ७. | कर कटावरी | तुकाराम | ११ |
| ८. | भीमरूपी स्त्रोत्र | रामदास | १३ |
| ९. | रुक्मिणी-पत्रिका | वामनपंडित | १५ |
| १०. | न गुरु-व्यसनींहि मी स-खेद-मना | मोरोपंत | १७ |
| ११. | मराठीचा गौरव | श्रीधर | १९ |

## २. अर्वाचीन कविता

| | | |
|---|---|---|
| १. निशाणाची प्रशंसा | केशवसुत | २१ |
| २. प्रीति निमाली तर — | विनायक | २३ |
| ३. एका जुन्या श्लोकाची आठवण | गोविंदाग्रज | २४ |
| ४. तू तर चाफेकळी | बालकवी | २५ |
| ५. शारदे ! | चंद्रशेखर | २६ |
| ६. ये पहाटचा तारा गगनी | भा. रा. तांबे | २७ |
| ७. चिरयौवन | अनिल | २९ |
| ८. सुखरूप आहे ना ग ? | माधव जूलियन | ३१ |
| ९. विसङ्गतीतील गूढ | यशवन्त | ३४ |
| १०. कानगुजला | केशवकुमार | ३६ |
| ११. माझे काव्यगायन | रा. श्री. जोग | ३७ |
| १२. ज्ञानदेव गेले तेव्हा | बा. भ. बोरकर | ३९ |
| १३. हिमलाट | कुसुमाग्रज | ४० |
| १४. रमणी, उदविशि निज कचभार | कान्त | ४२ |
| १५. शेला | इंदिरा | ४३ |
| १६. किती तरी दिवसांत | बा. सी. मर्ढेकर | ४४ |
| १७. मोहोळ | वि. म. कुलकर्णी | ४६ |
| १८. स्नेह मी जागवीन आपुला | कृ. ब. निकुम्ब | ४८ |
| १९. सत्कार | मंगेश पाडगावकर | ४९ |
| २०. केवळ माझा सह्यकडा | वसंत बापट | ५१ |

सा हि त्य – प रा ग

‘ आम्हीं भावांचे पाहुणे ’

ज्ञा न दे व

मग निःसीमु भाऊ उल्हासें । मज अर्पावेयाचेनि मीसें
फल एक आवडे तैसें । भले तेयाचें
मग भक्तु माझेयाकडें अलुमालु दाखवी । आणि मीं दोन्हीं हात ऊडवीं
मग देंटु न संडितां सेवीं । आदरेंसीं
पैं गा भक्तीचेनि नावें । फूल मज एक देयावें
तें लेखें तरि सियां तुरंबावें । परि मुखिं चिं घालीं
हें असो काइसीं फुलें । पान चि एक आवडतें जालें
तें साजुक ही न्हवे सूकलें । भले तैसें
परि सर्व भावें भरलें देखें । आणि भूकेला ऐसा अमृतें तोखे
तें पत्र चि परि तेणें सुखें । आरोगुं लागें
अथवा ऐसें हीं एक घडे । जें पाला ही परि न जोडे
तरि उदकाचें सांकडें । नव्हेल कीं
तें भले तेथ निमोलें । न जोडितां असे जोडलें
तें चि सर्वस्व करूनि अर्पिलें । जेणें मज
तेणें वैकुंठापासौनि विशालें । मज लागि केलीं राउलें
कौस्तुभाहूनि निर्म्मलें । लेणीं दीधलीं

दूधाचीं सेजारें । क्षीराब्धी ऐसीं मनोहरें
मज लागि अपारें । सृजिलीं तेणें

कर्पुरु चंदनु अगरु । ऐसेया सुगंधांचा मनोहरु
मज हातीं लाविला दिनकरु । दीपमाले

गरुडा सारिखीं वाहनें । सुरतरूचीं उद्यानें
कामधेनूचीं गोधनें । अर्पिलीं तेणें

मज अमृताहूनि सुरसें । बोनीं वोगरिलीं बहुवसें
ऐसा भक्ताचेनि उदकलेशें । परितोषे गा

हें सांघावें काइ किरीटी । तुह्मीं देखिलें आपुलिया दीठी
मीं सुदामेयांचिया सोडीं गांठी । पहुवेयां लागि

पैं गा भक्ति एकि मीं जाणें । तेथ सानें थोर न ह्मणें
आह्मीं भावांचे पाहुणे । भलेतेया

एर पत्र पुष्प फल । तें भजावेया मीस केवल
आमचा लागु निखल । भक्तितत्त्व

## ' तंवं देखीन्निली राजधानी : यादवां ची '

भास्करभट बोरीकर

पांचाळ देशू लंघौनीं : पातलांसे झड करौनी
तंवं देखीन्निली राजधानी : यादवां ची
तें जेवी विश्वकर्मेयां आराधितां : शिल्पविद्ये ची अधिष्ठात्री देवता
प्रत्यक्षु जाली वेळु न लगतां : भूमण्डळीं
ना तरि दिव्यतेजा ची मांदूस उघडली : कीं विश्वप्रकाशांची पेटी-फूटली
कीं नव रत्नां ची खाणी लागलीं : समुद्रा माजीं
कीं रावणा चेनि भुजां-बळें : कैलासतेजू आंदौळलें
तें बिहाले पणें सहेशें लपविलें : समुद्रा माजीं
कीं पर्वतां जाली इंद्रवाहार : तै समुद्रा चे करौनी राजघर
आपुलें लपविलें अंतौर : मेरूपर्वतीं
कीं लाटा चेनि पैले : वडवानळा चे तेजु हेलावले
कीं वैकुंठ प्रतिबिंबलें : समुद्रा माजी
कीं त्रिगुणां चिअें पैली अवघडूं : निर्मिला शांभव सुखां चा मढू
तेथ ठेवा असें उघडूं : परब्रह्मां चा
कीं जगां तें भूलवीति : ते श्रीकृष्णाची वेधवती
तैसी देखीनिली द्वारावती : दुरौनियां

## ज ना बा ई

साळी सडायासी काढी । पुढें जाउनी उखळ झाडी
कांडितां कांडितां । शीण आला पंढरिनाथा
सर्वांगीं घाम आला । तेणें पीतांबर भिजला
पायीं पैंजण हातीं कडीं । कोंडा पाखडोनि काढी
हातां आला असे फोड । जनी म्हणे मुसळ सोड.

आंधळ्याची काठी । अडकली कवणे बेटीं
माझिये हरिणी । गुंतलीस कोणे रानीं
मुकें मी पाडस । चुकलें भोवें पाहें वास
तुजवीण काय करूं । प्राण किती कंठीं धरूं
आतां जीव जाऊं पाहे । धाव घाली माझे आये
माझी भेटवा जननी । संतां विनवी दासी जनी.

•

ताट विस्तारी रुक्मिणी । देव बैसले भोजनीं
इतुक्यामध्यें अकस्मात । ध्वनि उमटला कानांत
धावा ऐकतां श्रवणीं । ताट लोटी चक्रपाणी
उठिला खडबडोनि कैसा । पावे बहिणीचिया क्लेशा
उभीं वृंदावनीं बाळा । पुढें देखिला सांवळा
मुकुट कुंडलें मेखळा । वैजयंती वनमाळा
शंख चक्र आयुधें करीं । दिसे घवघवीत हरि
झळके पीतांबर कांसे । नयनीं कोंदला प्रकाशे
पाहतां आनंदली मनीं । म्हणे नामयाची जनी.

# सगुणचरित्रें

## ए क ना थ

सगुणचरित्रें परमपवित्रें हरिचीं वर्णावीं
सज्जनवृंदें मनोभावें आधीं वंदावीं
संतसंगें अंतरंगें नाम बोलावें
कीर्तनरंगीं देवासंनिध सुखेंचि डोलावें
भक्तिज्ञानाविरहित गोष्टी इतर न कराव्या
संतासंगें वैराग्याच्या युक्ती विवराव्या
जेणेंकरुनी मूर्ति ठसावें अंतरें श्रीहरिची
ऐसी कीर्तनमर्यादा हे संतांचे घरची
अद्वयभजनें अखंडस्मरणें वाजवि करताळी
एका जनार्दनीं मुक्ति होय तत्काळीं

# जागल्या

## ए क ना थ

उठा जी की माय-बाप कशी लागली झोंप
हुजूर जाउनियां एवढी चुकवा खेप
तुमच्या नगरीची नाहीं नांदणुक बरी
तुमच्या सेजेला दोन लोभिष्ट नारी
त्यांच्या योगें दुःख तुमच्या नगरींत भारी
हिंडतां जन्म-जन्मांतरिं चौऱ्यांयशि जग
अजून सांपडला नाहीं तुम्हां नीट मार्ग
कोणतें हित केलें बापा ! खरेंचि सांग
जुन्या ठेवण्याचा तुम्हि पुर्जा काढा
एका जनार्दनीं धरा बळकट मेंढा
चाकर हुजूरचा देईन अवघा झाडा.

‘ चिन्हें दाऊनियां ऐशीं ’

मु क्ते श्व र

धृतराष्ट्र पुसे विदुरसुमती । पांडव गेले कवणे रीतीं
विषाद किंवा संतोषवृत्ती । बाह्यचिन्ह जाणिजे
पांचही पुत्रांचें चेष्टित । भिन्नलिंगी अंतर्गत
क्षेम किंवा प्राणघात । सूचक कैसें सांग पां
कवण दावूनि आकारू । गेली द्रौपदी सुंदरू
धौम्यनामा ऋषीश्वरू । गेला कैसा सांग पां
विदुर बोले सखेद वचन । वस्त्रें आच्छादूनि वदन
धर्में केलें वनप्रयाण । न बोलतां कवणासीं
उभारूनि भुजा सरळी । अवलोकीत क्रोधानळीं
हुंकार करीत महाबळी । भीम गेला त्यापाठीं
वाळुका घेऊनि वाममुष्टीं । सव्य विखुरीत पृथ्वीतटीं
मस्तक तुळीत वीरजेठी । गेला किरीटी वनवासा
कर्दमें लेपूनियां मुख । सहदेव जातां देखती लोक
जैसा अभ्रपडळें अर्क । आच्छादिला न लोपे
मृत्तिका चर्चूनि सर्वांगी । नकुळ गेला धर्ममार्गीं
जैसा योगी सिद्धसंगीं । ब्रह्मतेजें विराजे
केश मोकळे झाडीत हस्तीं । गेली द्रौपदी महासती
हृदयानळा अश्रुपातीं । शांतवीत सिंचनें

दर्भमुष्टी धरूनि धौम्य । पढत अंत्येष्टीचें साम
जेष्टकनिष्ठांचीं नामें । आलोटीत तर्पणा

तोही गेला धर्मापाठीं । बरवें न दिसे माझिया दृष्टीं
विशेष कांहीं न वद्वे गोष्टी । शोकें सृष्टी आहाळेल

धृतराष्ट्र म्हणे गा विदुरा । प्रकटार्थ निरोपी चतुरा
ऐसीं लक्षणें कुंतीकुमरां । कारण कोण दावावया

क्षत्ता म्हणे न ये अनुवादुं । तथापि भविष्यार्थ हृदयबोधु
आजूनि तरी विचार नांदू । आत्महिताचा तुजमाजीं

आपुले नयनें हव्यवाटीं । भस्म होईल सर्व सृष्टी
म्हणोनि न पाहात दृष्टीं । धर्म गेला जाण पां

आणीक एक कारण येथें । चौदा वर्षां कौरवप्रेतें
पाहों न शकें म्हणोनि हातें । दृष्टी झांके दयाळु

दोर्दंड अवलोकूनि क्रूर । संकल्प नेमी वृकोदर
वधोनी धृतराष्ट्राचे कुमर । सार्थक करीन भुजांचें

समुद्रीचें वाळुकाकण । इतुके विंधूनिया बाण
करीन कौरवांचें हनन । साह्य संगीं सर्वेही

म्हणोनि फाल्गुन वीर विचित्र । फल्गु मानी पितृव्यपुत्र
पुढती फाल्गुनाचा मंत्र । हा फाल्गुन मी कर्ता

माझें दुःख न कळे कोण्हा । म्हणोनि चिखल लावी वदना
सहदेव गेला तेही संज्ञा । कुरुभूषणा जाण पां

माझें सौंदर्य देखतां नयनीं । भुलोनि जाती जनकामिनी
या लागीं नकुळें मृत्तिकाकणीं । तनू घोळिली राजसा

अश्रुपातीं चौदा वर्षां । हृदय पिटितील मुक्तकेशा
धृतराष्ट्राच्या सर्वेही स्नुषा । उदकक्रिया करितील
एकशत कौरवनारी । मजहूनि कष्ट भोगिती भारी
ऐसें द्रौपदी सुंदरी । दावूनि गेली वनवासा
कौरवांची उत्तरक्रिया । मीच सांगेन धर्मराया
कुश हस्तीं अर्पावया । धौम्यें धरिलें जाण पां
सुनासहित श्रेष्ठ गांधारी । आणि नगरींच्या सकळ नारी
बुडती शोकाच्या सागरीं । तें मी दृष्टी देखेन
चिन्हें दाऊनियां ऐशीं । वना गेला सत्त्वराशी
ते वेळीं उत्पात आकाशीं । अत्यद्भुत उदेले.

## ‘ कर कटावरी ’

तु का रा म

कर कटावरी तुळसीच्या माळा
ऐसें रूप डोळां दावीं हरी
ठेविले चरण दोन्ही विटेवरी
ऐसें रूप हरी दावीं डोळां
कटीं पीतांबर कास मिरवली
दाखवीं वहिली ऐसी मूर्ती
गरुडपारावरी उभा राहिलासी
आठवे मानसीं ते चि रूप
झुरोनी पांजरा होऊं पाहें आतां
येईं पंढरीनाथा भेटावया
तुका म्हणे माझी पुरवावी आस
विनंती उदास करूं नये.

वांझेनें दाविलें गऱ्हवार लक्षण
चिरगुटें घालून वाथयाला
तेवीं शब्दज्ञानी करिती चावटी
ज्ञान पोटासाठीं विकूनियां

बोलाचि च कढी बोलाचा च भात
जेवुनिया तृप्त कोण जाला
कागदीं लिहितां नामाची साकर
चाटितां मधुर गोडी नेदी
तुका म्हणे जळो जळो ते महंती
नाहीं लाज चित्तीं आठवण.

आम्ही वैकुंठवासी । आलों या चि कारणासी
बोलिले जे ऋषी । साच भावें वर्ताया
झाडूं संतांचे मारग । आडरानें भरलें जग
उच्छिष्टाचा भाग । शेष उरलें तें सेवूं
अर्थें लोपलीं पुराणें । नाश केला शब्दज्ञानें
विषयलोभीं मनें । साधनें बुडविलीं
पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा
तुका म्हणे करा । जयजयकार आनंदें.

# भीमरूपी स्तोत्र

रा म दा स

भीमरूपी महारुद्रा, वज्र हनुमान मारुती
वनारी अंजनीसूता, रामदूता प्रभंजना
महाबळी प्राणदाता, सकळां उठवी बळें
सौख्यकारी शोकहर्ता, धूर्त वैष्णव गायका
दीननाथा हरीरूपा, सुंदरा जगदंतरा
पातालदेवताहंता, भव्यसिंदूरलेपना
लोकनाथा जगन्नाथा, प्राणनाथा पुरातना
पुण्यवंता पुण्यशीळा, पावना परितोषका
ध्वजांगें उचली बाहो, आवेशें लोटला पुढें
काळाग्नि काळरुद्राग्नि, देखतां कापती भयें
ब्रह्मांडें माइलीं नेणों, आंवाळे दंतपंगती
नेत्राग्नी चालिल्या ज्वाळा, भ्रुकुटी ताठिल्या बळें
पुच्छ तें मुर्डिलें माथा, किरीटी कुंडलें बरीं
सुवर्ण कटि कांसोटी, घंटा किंकिणि नागरा
ठकारे पर्वता ऐसा, नेटका सडपातळू
चपळांग पाहतां मोठें, महाविद्युल्लतेपरी
कोटिच्या कोटि उड्डाणें, झेंपावे उत्तरेकडे
मंद्राद्रीसारखा द्रोणू, क्रोधें उत्पाटिला बळें

आणिला मागुतीं नेला, आला गेला मनोगती
मनासी टाकिलें मागें, गतीसी तुळणा नसे
अणूपासोनि ब्रह्मांडाएवढा होत जातसे
तयासी तुळणा कोठें, मेरु-मंदार धाकुटे
ब्रह्मांडाभोंवते वेढे, वज्रपुच्छें करूं शके
तयासी तुळणा कैंची, ब्रह्मांडीं पाहतां नसे
आरक्त देखिलें डोळां, ग्रासिलें सूर्यमंडळा
वाढतां वाढतां वाढे, भेदिलें शून्यमंडळा
धनधान्य पशुवृद्धि, पुत्रपौत्र समस्तही
पावती रूपविद्यादि, स्तोत्रपाठेंकरूनियां
भूतप्रेतसमंधादि, रोगव्याधि समस्तही
नासती तुटती चिंता, आनंद भीमदर्शनें
हे धरा पंधराश्लोकी, लाभली शोभली बरी
दृढदेहो निसंदेहो, संख्या चंद्रकळा गुणें
रामदासीं अग्रगण्यू, कपिकुळासि मंडणू
रामरूपी अंतरात्मा, दर्शनें दोष नासती.

## रुक्मिणी-पत्रिका

वामन पंडित

अनुक्रम ८९५८१ विः काव्य ५१३६६८ १७६८

श्रोत्यांचिया श्रवणरंध्रिं रिघोनि चित्तीं
तूझे गुण त्रिविध ताप हरी हरीती
ऐकोनियां भुवनसुंदर या गुणांतें
निर्लज्ज चित्त हरि हें तुजला वरीतें.

विद्या वय द्रविण रूप इहीं करोनी
हा आत्मतुल्य पति हेंचि मनीं धरोनी
जे सर्व-लक्षण-विचक्षण सत्कुलीना
ते कां नृसिंह नवरी तुजला वरीना.

जे सर्व-लक्षण-विचक्षण आणि धीरा
तेही तुझे गुण असे जगदेकवीरा
ऐकोन कोण नवरी न वरील तूंतें
निर्लज्ज यास्तव झणी म्हणशील मातें.

देहार्पणा करुनि तूं पति म्यां वरीला
जाया करीं हरि तुं नेउनि शीघ्र माला
सिंहांगनेसि मज नेइल अंबुजाक्षा
जंबूक चैद्य जरि तूं करिशी उपेक्षा.

म्यां तूज निश्चित मनें वरिलें अनंता
येऊनियां करि धरूनि करीं स्व-कांता
सिंहांगनेसि मज जंबुक अंबुजाक्षा
नेईल चैद्य जरि तूं करिशी उपेक्षा

सर्वेश्वरार्पण विधी करुनी अ-गण्यें
केलीं जरी असति कीं बहु-जन्म-पुण्यें
येऊनियां मज करीं धरिं चक्रपाणी
हे नातळोत दमघोष-सुतादि कोणी.

लग्नाचिया पहिलिया दिवसांत यावें
संगीं समग्र बळ यादवसैन्य घ्यावें
या चैद्य-मागध-बळांबुधितें मथावें
मातें निशाचर-विधी करुनी हरावें.

शर्वादि सर्व तुझि इच्छिति पाय-धूळी
तूझा प्रसाद नव्हतां मज याच काळीं
जन्मा शतांत मरणें स्मरणें मुकुंदा
अंतीं तुझ्याच वरणें चरणारविंदा.

मो रो पं त

संजय म्हणे, " नृपाळा ! परिसावें युद्धवृत्त. जैं द्रोण
धृष्टद्युम्नें वधिला, तेव्हां भ्याला न वीर तो कोण ?
पळती बळें समस्तें, हरिपासुनि मृगकुळें जसी भीती;
त्यांतें मागें फिरवी दुर्योधनभूप सांगुनी नीती.
' ऐका हो ! वीर तुम्ही, मी तुमच्या भुजबलाश्रयें शुद्ध
यश जोडाया कुंतीपुत्रांसीं मांडिलें महायुद्ध.
दिसतां विषण्ण सर्व द्रोणवधीं, मरति वीर युद्धांत;
फल जय कीं वध होणें, हा निश्चय निश्चल प्रबुद्धांत.
द्रोणवधें रिपु मानिति जय, मानूं द्या; न चित्र हें; तोही
क्षणमात्रचि; कीं पावति न जयातें सर्वथा गुरुद्रोही.
युद्ध करील महात्मा कर्ण, पहा हो ! तुम्ही कुतूहल तें.
विसरेल दुःख तुमचें मन, जें द्रोण स्मरोनि हळहळतें.
रामप्रसादलब्धें दिव्यास्त्रें योजितांचि, अंगेना
पाहों न शकेलचि; परबळ-करिकुळ हरिसमक्ष भंगेना ?
युद्धीं सदाहि ज्या नरसिंहाचा पार्थमृग धरि त्रास,
परिसा त्याच्या रिपुमदमहिषमहाशक्तिच्या चरित्रास.
मानुषयुद्धेंचि, गजायुतबल खलभीम त्या अवस्थेला
जेणें, सेनापति गुरु असतां, समरांगणीं क्षणीं नेला.

दिव्यास्त्रज्ञ घटोत्कच, अतिशूर, क्रूरभाव, मायावी
जेणें वधिला वासवशक्तीनें जीस न क्षमा यावी;
त्या या कर्णाचें भुजबल, खलबलजलधिमाजि देखाल;
मग संक्षुब्धौर्वानलदर्शन झालें, असेंचि लेखाल.
करितां विक्रम कर्णद्रौणी दिसतील विष्णुवासवसे.
यांच्या ठायीं चापश्रुति करुनि प्रकट वैभवास वसे.
भीष्मद्रोणवधजयें झाला मद पांडवांसि, तो यांचा
विक्रम करिल क्षीण, ग्रीष्म जसा लघुतडागतोयांचा.
त्या कुंतीपुत्रांच्या अति दक्ष तुम्ही असां सखे, दमना.
तुमच्या विजयिभुजबलें न गुरु-व्यसनीं हि मीं स-खेद-मना."
ऐसें निजवीरांचें करुनि समाधान, सादरें चित्तें
दुर्योधनें स्वसेनापति केला कर्ण, वांटिलीं वित्तें.

## श्री ध र

प्राकृत भाषा म्हणोनी । अव्हेर न करावा पंडितजनीं
जैसीं कृष्णा-वेणेचीं तीरें दोन्ही । परी उदक जाण एकचि
तैसें प्राकृत आणि संस्कृत । दोहींत एकचि अर्थ
जैशा दोघी स्त्रिया एकचि कांत । कीं दोन्ही हस्त एकाचेचि
दोन्ही दाढा एकचि स्वर । एक पाहणें दोही नेत्र
कीं दों पात्रांत पवित्र । एकचि दुग्ध घातिलें
दोन्हीमाजी गोडी एक । जैसें त्रिवेणीस भरलें उदक
एक सुवर्णकूपिका अमोलिक । ताम्रधातूची एक घडली
दोन्ही कुप्या नेऊनि देख । श्रीरामेश्वरासी केला अभिषेक
दोन धातु एक उदक । देवास समचि आवडे
अबळांस न कळे संस्कृत वाणी । जैसें आडांतील गोड पाणी
परी तें दोर-पात्रा-वांचोनी । अशक्त जना केविं निघे
तोचि तडागासी येतां त्वरें । तात्काळचि तृषा हरे
अबळा जना तारावया ईश्वरें । प्राकृत ग्रंथ निर्मिले
मुख्य संस्कृत बघावें । परी तें अबळांसी नुगवे
महागज कैसा बांधवे । कमळतंतू घेउनी
सर्वांस मान्य गीर्वाण । जरी असेल पूर्वपुण्य
तरीच तेथींचें होईल ज्ञान । तरी अबळा जन केविं तरती

उत्तम वस्त्रें लेती नृपती । तीं दुर्बळांसी केविं प्राप्त होती
मग ते घोंगडीच पांघरती । शीतोष्ण-निवारणा
जैसें दधी मंथितां बहुत । त्यांतून निघे नवनीत
कीं स्वातीजळापासोन अद्भुत । मुक्ताफळ निपजे
कीं इक्षुरसापोटीं शर्करा । रसनेसि गोडी तेचि विचारा
कीं राजियापासून राजपुत्रा । मान्यता होय बहुतचि
मऱ्हाटी वचनें निश्चित । परी अत्यंत रसभरीत
मधुमक्षिकांचे मुखीहूनी स्रवत । अती सु-रस जैसा कां
गीर्वाण हें शशिमंडळ अद्भुत । त्याची प्रभा हें प्राकृत
संस्कृत ग्रंथ वर्णिती पंडित । अर्थ प्राकृत करिती पैं
सिकतेमाजी दिव्य रत्न । जरी सांपडे न करितां प्रयत्न
तरी चतुरीं करावें जतन । किंवा अव्हेर करावा
कष्टेंवीण राज्य आलें हातां । तरी कां वोसंडावें तत्त्वतां
प्राकृतभाषा ऐकोनि कथा । लाभ श्रोतीं घेईजे तेवीं
मुक्ताफळाचिया माळा । वरी सुवास सुटला आगळा
तरी चतुरीं कां न घालाव्या गळां । अती आवडी करूनी
आधींच इक्षुदंड गोड । त्यावरी आले शर्करेचे घड
तैसी रघुनाथ-कथा सुवाड ।। त्यावरी साहित्य पुरविलें.

## निशाणाची प्रशंसा

केशवसुत

तुज जरि करिती काठीला लावुनिया पटखंड,
तरि तुजमध्ये वसत असे बा सामर्थ्य उदंड !

कोण नेतसे समरास सांग बरे रणधीर,
माराया की मरावया कृतनिश्चय ते वीर ?

शूरशिरांवरि धीटपणे युद्धाच्या गर्दीत,
कोण नाचते फडकत रे स्फुरण त्यास आणीत ?

तारू पसरुनि अवजारे भेदित सिंधू जाय,
तच्छिखरी तत्साहस तू मूर्त न दिसशी काय ?

उंच-उंच देवायतने भव्य राजवाडे,
तुंग दुर्गेही शिरी तुला धरिताती कोडे !

भक्ति जिथे दिव्यत्व जिथे, उत्सव जेथे फार,
तेथे-तेथे दिसे तुझा प्रोत्साहक आकार !

वीर्य जिथे, ऐश्वर्य जिथे, जेथे जयजयकार,
उंचावर तेथे-तेथे दिसे तुझा आकार !

म्हणून मानवचित्ताची उंचावर जी धाव,
तीचे चिन्हच तू, तुजला निशाण सार्थच नाव !

संग्रहालय

मिळमिळीत ज्याची कविता न असे रंडागीत
खचित जडेलचि त्या कविची तुझ्यावरी रे प्रीत
संसारा मी समर गणीं; उचलुनि म्हणुनि निशाण,
साद घालितो, " योद्धे हो ! झटुनि भिडुनि द्या प्राण ! "

# प्रीती निमाली तर

**वि ना य क**

नादे मंजुल आपुल्या रिझविते जी मन्मना नेहमी
ती एका निमिषात रम्य मुरली भंगून टाकीन मी !
अंगाते जडवून पंख उसने जाईन की सत्वर
मी येथून उडून उंच गगनी प्रीती निमाली तर !

माझी कोण करील उत्सुक मने मार्गप्रतीक्षा घरी ?
प्रेमे बालक कोण सुंदर वदा देईल माझ्या करी ?
आता भासतसे मला भवन जे सर्वस्व चेतोहर
त्या येईल खरोखरीच वनता प्रीती निमाली तर !

काव्याला अनुरूपसा विषय तो कोठून राहे जनी ?
स्फूर्तीच्या उठतील नित्य लहरी कैशा कवीच्या मनी ?
वाहावी कवणास काव्यसुमने त्याने वदा भूवर ?
कोठूनी जगती उरे रसिकता प्रीती निमाली तर ?

अस्ता जाइल सूर्यतेज वितरी विश्वास जे जीवन;
तेणे व्याप्त समस्त होइल जगत दुःखांधकारे घन;
सौख्याचा लवलेशही न मनुजा लाभेल हो दुर्धर;
भीतीने मरतील मानवकुले प्रीती निमाली तर !

# एका जुन्या श्लोकाची आठवण !

गो विं दा ग्र ज

“ डोळ्यांनीं बघतों, ध्वनी परिसतों कानीं, पदीं चालतों,
जिव्हेनें रस चाखतों, मधुरही वाचे अम्ही बोलतों,
हातांनीं बहुसाळ काम करितों, विश्रांति ही घ्यावया
घेतों झोंप सुखें — फिरून उठतों, ही ईश्वराची दया ! ”

पूर्वी पूर्ववये प्रसन्नमयता जेव्हा मिळे सृष्टिला
शाळेच्या चिमण्या जगात असता हा श्लोक मी वाचिला;
साध्या बाळमनास अर्थ पटला, – आनंदही वाटला,
आता का करुणारस स्मृतिबले त्याच्या असा दाटला ?

डोळ्यांनी बघणे, ध्वनी परिसणे, इत्यादि सर्वा क्रिया
आताही घडती; उपाधि चुकल्या नाहीत जीवासि या;
जेव्हा जीव थकून पाहत परी विश्रांति ही घ्यावया
नाही झोप सुखे,—अहो, हरपली ही ईश्वराची दया !

सौंदर्ये भरल्या जगास बघुनी हा प्रश्न चित्ती उठे,
जीवाने जगि काय कार्य करणे श्लोकात नाही कुठे !

# तू तर चाफेकळी

बा ल क वी ठो म रे

" गर्द सभोती रान साजणी तू तर चाफेकळी !
काय हरवले सांग शोधिसी या यमुनेच्या जळी ? "

ती वनमाला म्हणे, " नृपाळा, हे तर माझे घर.
पाहत बसते मी तर येथे जललहरी सुंदर.
हरिणी माझी तिला आवडे फारच माझा गळा;
मैना माझी गोड बोलते, तिजला माझा लळा.
घेउन हाती गोड तिला त्या कुरणावरती फिरे
भाऊ माझा, मंजुळवाणे गाणे न कधी विरे. "

" रात्रीचे वनदेव पाहुनी भुलतिल रमणी तुला;
तू वनराणी, दिसे न भुवनी तुझिया रूपा तुला.
तव अधरावर मंजुळ गाणी ठसली कसली तरी;
तव नयनी या प्रेमदेवता धार विखारी भरी !
क्रीडांगण जणु चंचल सुंदर भाल तुझे हे गडे,
भुरुभुरु त्यावर नाचत सुंदर कुंतल कुरळा उडे.
अर्धस्मित तव मंद मोहने, पसरे गालावरी,
भुलले तुजला हृदय साजणी, ये चल माझ्या घरी. "

# शारदे !

चंद्रशेखर

जातीच्या सुमनापरी धवल जे, सद्गंध जे कोवळे,
दर्भाच्याच तुऱ्यापरी शुचि तसे अत्यंत जे सोवळे,
लोहाळ्यासम नीट जे, तरि तुला वाटेल तैसे वळे,
लोहातुल्य दुजांस, चुंबकगुणे तूतेच जे आकळे;

जे हंसासम उंच-उंच गगनी वातातुनी पोहले,
यानातोनि सुकल्पनामय महामेरूस आरोहले,
माघारे गरुडापरी उतरुनी नीडात जे राहिले,
ते माझे मन शारदेस तुजला प्रेमेच मी वाहिले.

प्रेमानंद जया मनी समरसे त्या काव्यमोदासवे,
त्यायोगे नयनांमधूनि गळती मोत्ये न ती आसवे,
पाणीदार, अमोल, दुर्मिळ अशी ती चौगुणी गुंफिली,
ज्या स्नेहाळ मने ममत्व धरुनी देवीस तूते दिली;

प्रेमी, सोज्ज्वल, ते उदात्त मन, जे वेडे तुझ्या कारणे
त्याची सर्वहि ईप्सिते पुरवुनी त्वा फेडणे पारणे.

# ये पहाटच्या तारा गगनी

भा. रा. तांबे

ये पहाटच्या तारा गगनी
कुणिकडे निघशि लगबग करुनी ?
तारस्वरि आरवे कोंबडा,
सुरू न झाला अजुनि चौघडा,
काक एक जागला निसुरडा.
खाकारि कुठे तरी वृद्ध कुणी.
अजुनि रात्र ही देइ जांभया,
घरोघरी मिणमिणती समया;
निघशि झुंजुमुंजू या समया,
वाटे न भीति का तुज तरुणी ?
शुक्राची चांदणि झळके वरि,
भूवरिची चांदणि तू कुमरी !
तुझी न येई तिला सर परी,
लागेल दृष्ट तुज गे रमणी.
" वेळ घालवू नका हटकुनी,
गाठायाची मज पुष्करणी,
वनी कार्तिकस्नान करोनी
सूर्योदयि येणे मज फिरुनी. "

कुणी सोबतिण नाहि बरोबर;
वेळ चोर-जारांची ही तर;
मिळेल का त्या वनी खरोखर
या समयि सोबती तुला कुणी ?

# चिरयौवन

अनिल

फिरून वर्षचक्र हे पुढे पुढेच जातसे
विशी तिशी नि चाळिसीहि लोटली जरी दिसे
असे तरीहि गोठली न जीवनातली उषा
तशाच रंगसंगतीहि वृत्ति गुंगती तशा

अजून ऊन रक्त हे भरे नसानसातुनी
तसाच रोमहर्ष आणि अंग ये थरारुनी
विरक्ति ? छे ! सदानुरक्ति ! भक्ति ! प्रेमभक्त मी
तरंग ऊर्मि प्रीतिच्या अजून यौवनात मी !!

अजून यौवनात मी नि दंग जीवनात या
प्रसादही प्रमादही प्रमोद आणखी दया
विचार आणखी विकार भावनात पाझरे
मधू न त्यांतला सरे म्हणे न मीहि त्या पुरे

अरे कशास जीवना विचार आणसी मना
उदंड पाज आजची उद्याचि तीहि आण ना
पुरे भरावयास पात्र हे नको करू कमी
तिथे सदा अतृप्त मी अजून यौवनात मी !!

अजून यौवनात मी मुले फुले सभोवती
विकासती विलासती हसून हासवीत ती
प्रलोभनात प्रीतिच्या कुणी हसे झुरे जिथे
तिथे सखे नि सोबती कुणी इथे कुणी तिथे

प्रसन्न चित्त हासते बघूनिया मजेस त्या
मुलात मूल होत मी फुलांत भृंग होत त्या
भरीत रंग बैठकीत स्नेह सोबतीत मी
प्रियेस प्रेम होत मी अजून यौवनांत मी

अजून यौवनात मी जगात जागल्या अशा
जगावयास गावया पहावया उषा निशा
इथे निसर्गचारुता इथे प्रयत्न मानवी
उचंबळोनि वृत्ति ये उमेद घेउनी नवी

विवर्त भ्रांति भास हा अशा जगा म्हणो कुणी
मला इथेच सत्य ते दिसे पटे क्षणोक्षणी
विकासलेच ब्रह्म हें, न जीवबंधनात मी
नसे मुमुक्षु, मुक्त मी अजून यौवनात मी !!

# सुखरूप आहे ना ग ?

माधव जूलियन

[ १ ]

सुखरूप आहे ना ग
        माझा खेळकर तान्हा ?
कसा मोतियाचा दाणा
        बाळ माझा. १

सुखरूप आहे ना ग
        चेण्डूवाणी टणाटण
उड्या मारूनि अङ्गण
        गाजवी जो ? २

सुखरूप आहे ना ग
        माझा पण्डित पोपट
करी प्रश्न पटापट
        अवघड ? ३

सुखरूप आहे ना ग
        माझा छोटा तानसेन ?
अर्थ बोली गवसे न
        गवयाच्या ? ४

सुखरूप आहे ना ग
माझा छान्दिष्ट कुमार ?
खातो ना ग मऊ मार
मायेचा तो ? ५

सुखरूप आहे ना ग
दिनभर गलबला
करूनिया विलगला
रात्री तुला ? ६

[ २ ]

सुखरूप आहे ना ग
माझी बोबडी बाहुली
रानजाईची सानुली
रूपकळी ? ७

सुखरूप आहे ना ग
माझी साळुङ्की मञ्जुल
रानझरी झुळझुळ
वाहणारी ? ८

सुखरूप आहे ना ग
माझी हासरी चान्दणी,
मायमाण्डीच्या कोन्दणी
हिरकणी ? ९

सुखरूप आहे ना ग
माझी गौर झोल्यावर
गात ओवी गळ्यावर
पहिली ती ? १०

सुखरूप आहे ना ग
चन्द्रज्योतच घरीची
हृदयीच्या झुम्बरीची
स्नेहप्रभा ? ११

सुखरूप आहे ना ग
पोर आप्पाशी खेळून
नाना गाऱ्हाणी साङ्गून
झोपलेली ?

सुखरूप असशी ना
माझ्या चिमण्यांची आई
जिच्या जिवावर राही
निश्चिन्त मी ?

# विसङ्गतीतील गूढ

यशवन्त

केला अनुग्रह कसा त्यजुनी स्वभावा ?
प्रश्नात या कितितरी तव गूढ कावा !
वाटे विसङ्गतिमधे तुज गूढ का या ?
का साळसूदपण पाङ्‌घरतेस वाया ?

जे काल निःस्पृहपणे वदलो सभेत
का शारदीय ढग सोडियले हवेत ?
का वैभवास हुरळून परी नृपाच्या
गुन्तून येथ पडलो विसरून वाचा ?

हेही खरेच ललिते तुझिया पित्याचे
ऐश्वर्य मोहक किती तुज काय त्याचे ?
ते पाहता क्षणिच लोचनही दिपावे
स्वत्वाप्रती विसरुनी सहजीच जावे !

मी पाहिल्या अतुल मौक्तिक-रत्न-माला
त्यांची कधी भुरळ ना पडली मनाला.
स्रष्ट्यास मी उलट दोष दिला सदैव
की निर्मिले न मणि काञ्चन का सजीव ?

अव्हेरुनी नृपसभेमधि गौरवाला
मी पाहिले नृपतिच्या उजवी कडेला
तो खिन्न काञ्चन सकम्प सबाष्प रत्ने
आली अकल्पित दिसून विना प्रयत्ने ?

दोषांतुनि करुनि मुक्त तदा विधीला
मी मान त्या तुकविली नृपवैभवाला
झाली प्रफुल्ल मणि-हेमलता फिरून
का साळसूदपण ठाउक हे असून ?

# कानगुजला

केशवकुमार

तो आला जवळी, नि कानगुजला काहीतरी हासुनी,
तो शेजारिल मांजरावर तिने भिर्कावली फुंकणी !
" जा,—हिंडा,— सगळ्या सभा समजल्या ! आहे तुम्हांला मुभा !
सांभाळीत घरात मात्र बसु का मी कारट्यांची सभा ? "

तो आला जवळी, नि कानगुजला काहीतरी हासुनी,
तो पोळीवर ओतुनीच उठली रागामधे फोडणी !
" जा, आणा दुसरी खुशाल नटवी कोणी ! पहा नाटके !
येऊ का तुमच्यावरोबर असे नेसून मी फाटके ? "

तो आला जवळी, नि कानगुजला काहीतरी हासुनी,
पोतेरे दिधले तिने तडक तो भिंतीवरी फेकुनी !
" सारे कागद जा, चुलीत खुपसा ! दावू नका वाचुनी !
आंघोळीपुरते निघेल तुमच्या पाणी तरी तापुनी ! "

तो आला जवळी, नि कानगुजला देऊन काहीतरी,
तो आलिंगुनि ती म्हणे, " करविल्या केव्हा कुड्या या तरी ? "

# माझे काव्यगायन

रा. श्री. जोग

अजुनि आठवे मजला ती स्पष्टपणे वेळ
करित काव्यगायन पहिले – होत अखेरील.
        उभा राहता मज कोणी ‘ नाव घ्या ! ’ म्हणाले,
        सहज आणखी ते ‘ सरला ’ नाम मुखी आले !
        सभास्थान सर्व हशाने दुमदुमून गेले !
याहुनी सुरेख सलामी कोणती असेल ?
        लागलो म्हणाया कविता धीर परि धरून,
        ‘ रुष्ट सुंदरी ’ हा होता विषय काव्यपूर्ण.
        सुंदरीसवे श्रोतेही जात ते रुसून,
काव्य याहुनी परिणामी दुजे का मिळेल ?
        अभिप्राय येत किती ते अनाहूत तेव्हा
        ‘ पुरे, ’ म्हणे कोणी, कोणी म्हणतसे ‘ वहावा ’,
        नवल काय काहीकांनी तालही धरावा,
दाविती कितीक पसंती काढुनिया हेल !
        हळुच कोट अध्यक्षांनी ओढिला धरून,
        हळुच काही गोलाकृति ते येतसे वरून,
        हळुच कुणी घाली छत्री पावलांमधून,
विविध होति वीररसाचे यापरीस खेळ !

करित मी मनामधि तेव्हा पोक्तसा विचार,
शीर हे सलामत तर ती गायने हजार,
नसे काय विपुला पृथ्वी, कालही अपार?
कुणीतरी सहधर्मा तो कधीतरि मिळेल.

म्हणूनिया आलो तेव्हा परतुनी गृहाला,
काव्य ऐकवीले तें सहधर्मचारिणीला,
गानलुब्ध तीही होई, झोप ये तियेला,
काव्यरसिक तिजसम कोणी जगामधि नसेल!

अजूनीहि करितो कविता, ते न सुटायाचे,
दावितो म्हणून तिला त्या, ते न चुकायाचे;
किती मौज त्यात, तुम्हांला ते न कळायाचे,
करुनिया प्रयोग पहावा शक्य जरि असेल!

# ज्ञानदेव गेले तेव्हा

वा. भ. बोरकर

ज्ञानदेव गेले तेव्हा कोसळली भिंत
वेद झाले रानभरी गोंधळले संत
ज्ञानदेव गेले तेव्हा आटे इंद्रायणी
मराठीच्या वडातळी जळू लागे पाणी
ज्ञानदेव गेले तेव्हा ढळला निवृत्ति
आसवांच्या डोही झाली विझू विझू ज्योति
ज्ञानदेव गेले तेव्हा तडा विटे गेला
बापरखुमादेवीवरू कटीत वाकला
ज्ञानदेव गेले तेव्हा बापुडला नामा
लागोपाठ भावंडे ती गेली निजधामा
माझ्या ज्ञानराजा ! ते रे कळो आले आज
भर दुपारी ही तशी झाली तीनसांज
तेव्हाच्यासारखा पुन्हा बावला मोगरा
भुईवर झाल्या कळ्या तुटला आसरा
इथे आळंदीत आता ऊर मात्र फाटे
पंढरीच्या वाटेतही बाभळीचे काटे
कळ्यांचाहि वास जिवा जाहलासे फास
एकाकी प्रवास आता उदास उदास.

# हिमलाट

**कु सु मा ग्र ज**

हिमलाट पहाटे पहा जगावर आली !

मुखि पिळून मद्यास्तव द्राक्षांचे घोस
पाडीत मळे मोत्यांचे चरणी ओस
उद्दाम धावते करित दुभंग धरेस
करकरा पाखरे रगडी दाताखाली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली !

श्रीमंत महाली तिथे हिला ना थारा
मखमाली दुलया देती मधुर उबारा
डोकावुन पळते कापत हीच थरारा
हो काय दरारा कनकाचा भयशाली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली !

पाहून परंतू कुठे कुडाची खोपी
कंगाल कांबळी टाकुन गेले झोपी
शेकडो कवाडे ! वाट जावया सोपी
कडकडून पडते तेथे लाव भुकेली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली !

ज्योतीतुनि धावत या तेजःकण सारे
या यज्ञातिल अन सरणातील निखारे
रे ढाळ नभा, तव ते ज्वालामय तारे
पेटवु द्या वणवा कणाकणात मशाली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली !

# रमणी, उदविशि निज कचभार

**कान्त**

रमणी, उद्विशि निज कचभार
मृदुल रेशमी कुरळ मोकळा कृष्णसघन विस्तार
जाळिदार नाजूक टोपलें
शिर टेकुनि तू त्यावर अपुले
मदालसे, पहुडशी धरुनि कर उरी स्वस्तिकाकार
रमणी, उद्विशि निज कचभार
न्हाले ओले केस मोकळे
खांद्यावरुनी स्वैर पसरले
मोत्यांवाणी मधुनि चमकती, टिपुनिहि सलिलतुषार
रमणी, उदविशि निज कचभार
धूर सुगंधी धूपदाणिंतुनि
हळूच मिसळे कचपाशातुनि
अभिलाषा जणु तरुण जिवांच्या भ्रमति मंडलाकार
रमणी, उदविशि निज कचभार
सळसळती नागीणपिले ही
नयननीलिमा प्याली काही
धूर पाजुनी कशास करिशी अधिकचि धुंद विखार
रमणी, उद्विशि निज कचभार.

ठाणे नगर वाचन मंदिर, ठाणे. स्थापना
अनुक्रमांक ...८३५८१...... वि: ....काव्य...
क्रमांक .......१७६४...... नों: दि: ...०।१।६८

इं दि रा

निर्मल निर्भर वातावरणी
धुके तरंगे धूसर धूसर
झगमगते अन नक्षी त्यावर
सोनेरी किरणांची सुंदर

थंड गुलाबी कार्तिकातला
हवाहवासा स्पर्श तयाचा
सुगंध त्याला नाजुक मादक
नव्या उमलत्या वूच-फुलांचा !

चारुदत्त हा कोण कोठुनी
अंगावरला फेकित शेला
वसंतसेना वसुंधरेने
झेलुन तो हृदयाशी धरिला.

# किती तरी दिवसांत

बा. सी. मर्ढेकर

किती तरी दिवसांत
नाही चांदण्यात गेलो;
किती तरी दिवसांत
नाही नदीत डुंबलो.

खुल्या चांदण्याची ओढ
आहे माझी ही जुनीच;
आणि वाहत्या पाण्याची
शीळ ओळखीची तीच

केव्हातरी चांदण्यात
पुन्हा जाईन निर्भय;
गावकाठच्या नदीत
होईन मी जलमय

आज अंतरात भीती
खुल्या चांदण्याची थोडी;
आणि नदीचा प्रवाह
अंगावर काटा काढी.

बरा म्हणून हा इथे
दिवा पारवा पाऱ्याचा;
बरी तोतऱ्या नळाची
शिरी धार, मुखी ऋचा.

# मोहोळ

वि. म. कुलकर्णी

किर्र झाडीच्या दाट जंगलात
भिल्ल नित्यापरि फिरे टेहळीत
दिसे मोहळ फांदीस छानदार
लवे फांदी ती साहवे न भार !

फुलामागे शोधूनिया फुलास
साठवीती मधु करुनिया प्रयास
अशा मधमाशा मोहळावरून
घरे बांधुनि संसार करिति छान.

शुष्क काष्ठे, वाळला झाडपाला
झणी भिल्लाने तेथ साठवीला
रचुनि त्याची अन एक उंच रास
पेटवोनी ती देइ तत्क्षणास

आच माशांना प्रखर लागताच
दूर जाया धडपडति त्या वृथाच
पंख जळुनीया पडति चितेपोटी
हाय ! तडफडती, भस्मसात होती !

काढुनीया मद्य मोहळामधील
विकत नगरी नेऊन कुणा भिल्ल
सोय कोणाची कुठे तरी व्हावी
आणि तीस्तव किति जीवने जळावी !

# स्नेह मी जागवीन आपुला

कु. व. निकुंब

माहित होते, जाल उडुनिया दोन दिसांनंतर
– नव्हते ठाउक असे वियोगी उलेल हे अंतर !
पळापळाने झेपावत परि सन्निध ये वेळ ती,
दोन दिसांतिल उत्सवचित्रे भिरभिरती भोवती—
ती सूर्योपासना, वंदने, ती तेजोगायने !
आकाशहि उन्मुक्त विहरता आपण केले उणे.
सामोरे चाललो दिशांना घेत उंच मंडले,
नव्याच त्या अनुभूति – हर्ष नव हृदयी ओसंडले !
अजून तर त्या उन्मादाचा नच ओसरला भर
तोच पातली वियोगवेळा, उलते हे अंतर !

माहित होते, जाल उडुनिया दोन दिसांनंतर,
– नव्हते ठाउक परी वियोगी उलेल हे अंतर !
– ज्ञात तुम्हांला किति मजला प्रिय तुमची मधुसंगती —
कर्तव्याचे परि हे प्रियतर पाश इथे बांधती.
उद्या उतरतिल नवी पाखरे चहुकडुनी या स्थली,
पुन्हा सुरू होतील गायने, वंदन, मंत्रावलि !
आणि पुन्हा स्वच्छंद विहरता घेत उंच मंडले
चमचमतिल त्या अपूर्वतेने त्यांचे डोळे निळे !
त्यांच्या इवल्या नयनांतिल ती बघून तेजःकला —
— जा, जा, प्रिय विहगहो ! — स्नेह मी जागवीन आपुला !

# मंगेश पाडगावकर

पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

उरि जेव्हा ज्वालारस झेलुन
धरतीने तप केले दारुण
सुकता सुकता नद्या म्हणाल्या हाच विश्वसंहार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

त्या काळी धरणीच्या पोटी
या इवल्या बीजाच्या ओठी
थरथरली स्फुरली होती हो श्रद्धेची ललकार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

कवच भूमिचे आणि अचानक
भेदुनि आले हिरवे कौतुक
नचिकेताचे स्वप्नच अथवा अवचित हो साकार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

मातीची ही मात मृत्युवर
मृत्युंजय श्रद्धेचा अंकुर
हा सृजनाचा विजयध्वज, हा जीवनसाक्षात्कार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

म्हटले स्वागतगीत खगांनी
केला मुजरा लवुन दगांनी
लाल मातिचा गुलाल उधळित पवन करी संचार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

कोसळली सर दक्षिण उत्तर
घमघमले मातीतुनि अत्तर
अष्टदिशांतुन अभीष्टचिंतन, घुमला जयजयकार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

मराठी ग्रंथ
ग्रं. क्र. १४०५८
संग्र. शाखा

वसंत बापट

भव्य हिमालय तुमचा-अमुचा, केवळ माझा सह्यकडा
गौरीशंकर उभ्या जगाचा, मनात पूजिन रायगडा
तुमच्या-अमुच्या गंगायमुना, केवळ माझी भिवरथडी
प्यार मला हे कभिन्न कातळ, प्यार मला छाती निधडी
मधुगुंजन लखलाभ तुम्हांला, बोल रांगडा प्यार मला
ख्रिस्त बुद्ध विश्वाचे शास्ते, तुकयाचा आधार मला
धिक् तुमचे स्वर्गहि साती
इथली चुंबिन मी माती
या मातीचे कण लोहाचे, तृणपात्यांना खड्गकळा
कृष्णेच्या पाण्यातुन अजुनी वाहतसे लाव्हा सगळा !

कबीर माझा, तुळसी माझा, ज्ञानेश्वर परि माझाच
जयदेवाचा जय बोला, परि माझा नाम्याचा नाच
जनी जनार्दन बघणारा तो ' एका ' हृदयी एकवटे
जनाबाइच्या ओवीमध्ये माझी मजला खूण पटे
इंद्रायणिच्या डोहामधली गाथा ओली ती ओली
ती माझी, मी तिचाच, ऐशी जवळिक कायमची झाली

भक्तीचा मेळा दाटे
चोख्याची पैरण फाटे
निर्गुण मानवतेची पूजा करणारे करु देत भले
माझ्यासाठी भीमाकाठी भावभक्तिची पेठ खुले......

रामायण तर तुमचे-माझे भारतवर्षाचे
छत्रपतीची वीरकहाणी निधान माझ्या हर्षाचे
रजपूतांची विक्रमगाथा तुमच्यापरि मजला रुचते
हृदयाच्या हृदयात परंतू बाजी बाजीची सुचते
अभिमन्यूचा अवतारच तो होता माझा जनकोजी
दत्ताजीचा शेवटचा तो शब्द अजुन हृदयामाजी
'बच जायें तो और लढे !'
पाउल राहिल सदा पुढे
तुम्हांस तुमचे रुसवेफुगवे घ्या सगळा नाजुक नखरा
माझ्यासाठी राहिल गाठी मरहट्टयाचा हट्ट खरा.

तुमचे-माझे ख्यालतराणे दोघेही ऐकू गझला
होनाजीची सोनलावणी वेड लावते परि मजला
मृदंग मोठा सुमधुर बोले, मंजुळ वीणा अन मुरली
थाप डफाची कडकडता परि बाही माझी फुरफुरली
कडाडणारा बोल खडा जो दरीदरीमधुनी घुमला
उघडुनि माझ्या हृदयकवाडां तोच पवाडा दुमदुमला

तटातटा तुटती बंद
भिवईवर चढते धुंद
ओठ हात देहात अचानक वादळ घुसमटुनी जाते
उचंबळे हृदयात पुन्हा ते इतिहासाशी दृढ नाते

कळे मला काळाचे पाऊल द्रुतवेगाने पुढति पडे
कळे मला क्षितिजाचे वर्तुळ क्षणोक्षणी अधिकचि उघडे
दहादिशांचे तट कोसळले, ध्रुव दोन्ही आले जवळी
मीही माझे बाहू पसरुन अवघ्या विश्वाते कवळी
माझ्या घरची विशाल दारे, खुशाल ही राहोत खुली
मज गरिबाची कांबळ वाकळ सकळांसाठी आंथरली
मात्र भाबड्या हृदयात
तेवत आहे जी ज्योत
ती विझवाया पहाल कोणी मुक्त करुन झंझावात
कोटि-कोटि छात्यांचा येथे कोट उभारू निमिषात !

टी पा

## ज्ञा न दे व

संत, योगी, तत्त्वज्ञ आणि कवि या सर्वच दृष्टींनी ज्ञानदेवांची योग्यता केवळ अतुलनीय आहे. या सर्व अंगांचा विलोभनीय समन्वय त्यांच्या ठिकाणी झालेला आहे हे खरे, पण त्यांत कवित्वाची प्रभा काही आगळीच! वस्तुतः, ज्ञानदेवी हे गीतेवरील भाष्य. पण मूळ संस्कृत ग्रंथ आणि हे प्राकृत भाष्य यांची जर एकत्र परीक्षा केली, तर मूळ कोणते ते कळू नये अशी काव्यात्मता ज्ञानदेवांनी त्यात ओतली आहे. या 'अमृताशी पैज' जिंकणाऱ्या कवित्वाचे वैभव या वेच्यातही उमटले आहेच.

> पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति
> तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ ९. २६

असा मूळ श्लोक. पत्र, पुष्प, फल, तोय यांत ज्ञानदेवांनी मूल्याच्या दृष्टीने क्रम लावला आहे. भव्य, कोमल कल्पनाविलासाने देवाची भक्ती प्रकट केली आहे, आणि अखेर या भावपूर्ण आणि कल्पनारम्य पार्श्वभूमीवर 'पत्र, पुष्प, फल तें भजावेया मीस केवल' हा सिद्धान्त परिणामकारकपणे मांडला आहे.

मीसें – निमित्ताने.
आवडे तैसें – वाटेल ते.
भले तेयाचें – वाटेल त्या वृक्षाचे.
अळुमाळु – किंचित
वोडविणे – पुढे करणे.

लेखणें – विचार करणे, गणना करणे.
(लेखें – विचार केला तर)
तुरंबणें – वास घेणे.
आरोगणें – खाणे.
सांकडें – संकट.

निमोलें – किंमत नसलेले.

न जोडितां असें जोडलें – संग्रह न करताही सहज सापडते असे.

वैकुंठापासौनि – वैकुंठापेक्षा.

सेजार – शय्यागृह.

ऐसेया सुगंधाचा मनोहरु – या राजवाडेप्रतीतील पाठाऐवजी 'ऐसेया सुगंधाचा महामेरू' हा पाठ अर्थदृष्ट्या स्वीकारणे इष्ट आहे.

मज हातीं ... दीपमाले – त्यांच्या स्वतःच्याहाताने माझ्यासाठी दीपमाळेवर सूर्य (दिव्याप्रमाणे) लाविला.

बोनीं – पक्वान्ने.

वोगरलीं – वाढली.

बहुवसें – अनेक प्रकारची.

पहुवेया लागि – पोह्यासाठी.

एर – एरव्ही, इतर.

लागु – संबंध.

निखल – शुद्ध.

## भास्करभट बोरीकर

महानुभाव-संप्रदायातील हे एक श्रेष्ठ कवी. विद्वत्त्व आणि कवित्व यांचा दुर्मिळ संगम त्यांच्या व्यक्तित्वात झालेला आहे. 'शिशुपालवध' आणि 'उद्धवगीता' ही त्यांची प्रमुख काव्ये. बोरीकरांची काव्यकल्पना संस्कृत साहित्यशास्त्रावर पोसलेली दिसते. अभिजात कल्पकतेमुळे त्यांची काव्यात्मता अधिक बहारदार होते, आणि लालित्यपूर्ण शब्दकळेमुळे तिचा शृंगारसाज विशेष शोभिवंत होतो. म्हणूनच

मोतियांचें घोंषे । रांविले कुंकुमरसें
तऱ्हीं न एति करौं सरिसें । प्रबंधे सीं

असा आत्मविश्वास त्यांच्या वाणीत उतरतो.

यादवांना राजसूययज्ञाचे निमंत्रण देण्यासाठी धर्मराजाने वीरचूडाला पाठविले. त्याला दिसलेल्या सुवर्णमय द्वारकेचे हे वर्णन.

प्रत्यक्षु जाली – साक्षात अवतरली.
मांदूस – पेटी (मंजूषा).
व्रिहालेपणें – भ्यालयामुळे.
इंद्रवाहार – इंद्राकडून झालेली पीडा.
वाहार – पीडा.
अंतौर – अंतःपुर.
पैलें – लोटण्यामुळे, हिसळण्यामुळे.
शांभव – शंकराचे.
मढ़ं – घर, मंदिर, मठ.
वेधवती – आकर्षण करणारी शक्ती.

## ज ना बा ई

नामदेवाच्या कुटुंबात राहणारी ही एक दासी. पण आपल्या भक्तिभावनेच्या बळावर संतत्वाच्या आणि कवित्वाच्या उंच पदवीला ती पोहोचली आहे. 'नामयाची दासी जनी' आणि 'सखा माझा ज्ञानेश्वर' हे तिचे दोन्ही उद्गार यथार्थ आहेत. तिच्यावर एकीकडून नामदेव आणि दुसरीकडून ज्ञानदेव यांचा परिणाम झालेला आहे. आपल्या उत्कट श्रद्धेमुळे देव आपल्याबरोबर वावरतो, आपली उणीदुणीही कामे करतो, असे तिला एकसारखे वाटत असते. या वृत्तीमुळे जिवंत काव्यात्मतेचे भावगीतसदृश अभंग जन्माला येतात. परमेश्वराची आळवणी करताना कारुण्याची आर्द्रता तिच्या वाणीत उमटते. उपमा-दृष्टांतासारखे साधेसुधे आणि तेही सहजपणाने येणारे अलंकार सोडले, तर तिची शैली प्रायः अनलंकृतच आहे. पण निखळ भावना आणि तिची सरळ अभिव्यक्ती यांमुळे तिचे काव्य हृदयाचा वेध घेते.

भोवणें – भ्रमणे, वावरणे.

वास पाहणें – वाट पाहणे.

ताट विस्तारी रुक्मिणी – या अभंगात वस्त्रहरणप्रसंगी द्रौपदीने केलेला धावा ऐकून झालेल्या कृष्णाच्या अवस्थेचे आणि वृत्तीचे वर्णन आहे.

## ए क ना थ

एकनाथांचे सांस्कृतिक आणि साहित्यविषयक कर्तृत्व फार मोठे आहे. 'चतुश्लोकी भागवत', 'भावार्थ-रामायण', 'रुक्मिणी-स्वयंवर' आणि एकादश स्कंधावरील प्रचंड टीका 'एकनाथी भागवत' हे एकनाथांचे महत्त्वाचे ग्रंथ होत. यांशिवाय अनेक स्फुट प्रकरणे, आख्याने, चरित्रे, अभंग, पदे, गौळणी, भारुडे अशी विपुल रचना त्यांनी केली आहे. त्यांच्या प्रेमळ, प्रसन्न, सर्वभूतरत व्यक्तिमत्त्वाचा ठसा या रचनेत सर्वत्र नजरेला येतो. त्यांच्या लेखनावर ज्ञानदेवांचा प्रभाव असला, तरी ज्ञानदेवांची सूक्ष्म सौंदर्यदृष्टी आणि लालित्य-संपन्न शैली एकनाथांच्या ठिकाणी नाही. त्यांची लेखनपद्धती साधी, सरळ, स्पष्टीकरणात्मक आणि पाल्हाळिकही आहे.

अद्वयभजन – ब्रह्म आणि जीव एकरूपच आहेत अशा भावनेने केलेले भजन; एकात्मतेने केलेले भजन.

जागल्या – हे एक भारूड आहे. भारूड हे एक प्रकारचे आध्यात्मिक रूपकच होय. मायानिद्रेच्या अधीन झालेल्या सांसारिकांना जागे करणारे संत हे 'जागले' होत.

हुजूर जाउनियां – मालकाकडे, परमेश्वराकडे प्रयत्न करून.

खेप – जन्ममरणाचा फेरा.

नगरी – देहरूपी गाव.

नारी – अहंता आणि ममता या दोन स्त्रिया.

जुनें ठेवणें – निजरूप, पुरातन वस्तु, ब्रह्म. (ब्रह्मावर मायेचे आच्छादन असल्याने जीव वस्तुतः ब्रह्मस्वरूपच आहे हे, जीवाला कळत नाही.)

पुर्जा – आच्छादन.

मेंढा – खांब, आधार.

# मुक्तेश्वर

आख्यानक कवींतला मुक्तेश्वर एक प्रतिभासंपन्न कवी होय. याचे मूळ नाव आणि याचा काल याबद्दल विद्वानांत एकमत नाही. भारताची पाच पर्वे, 'संक्षेप-रामायण', काही स्फुट आख्याने, पदे, आरत्या अशी मुक्तेश्वराची रचना उपलब्ध आहे. हा एकनाथाचा नातू. पण एकनाथाच्या लेखनात न दिसणारी संपन्न कलात्मता मुक्तेश्वराच्या वाङ्मयात ठायी-ठायी विलसते. रेखीव प्रसंगवर्णने, जिवंत स्वभावचित्रणे आणि कल्पनासौंदर्याचे सहजसिद्ध लेणे यांमुळे मुक्तेश्वराची रचना चटकन यश जिंकून जाते. यामुळेच त्याने वारंवार काढलेल्या उक्ती अहंकाराच्या सीमेपर्यंत पोहोचूनही त्याला शोभून दिसतात.

सभापर्वातल्या या वेच्यात पांडवांच्या वनवासगमनाचा प्रसंग वर्णिलेला आहे.

मस्तक तुळीत – मस्तक तोलून धरीत, ताठ मानेने.
किरीटी – अर्जुन.
कर्दम – चिखल.
अभ्रपडळ – मेघांचा पडदा.
अर्क – सूर्य.
अंत्येष्टीचें साम – अंत्यसंस्काराच्या वेळी म्हणावयाचे मंत्र.
आलोटीत – लोटीत (येथे उच्चारीत).
आहाळणें – होरपळणे.
क्षत्ता – विदुर.
हव्यवाट – अग्नि.
दोर्दंड – मजबूत बाहू.
फाल्गुन – अर्जुन.
फल्गु – क्षुद्र, तुच्छ.
फाल्गुनाचा मंत्र – शंखध्वनी.
तो फाल्गुन मी कर्ता – तो फाल्गुन मास मी करीन. (अर्थ – माझ्यामुळे कौरवांवर फाल्गुन महिन्याप्रमाणे शंखध्वनी करण्याची पाळी येईल.)
संज्ञा – खूण.
उदकक्रिया – मरणानंतर करावयाच्या तिलांजलि देणे इत्यादि क्रिया.

## तु का रा म

तुकारामाची कविता म्हणजे जणू काही त्याचे आत्मचरित्रच! एक सामान्य सांसारिक श्रेष्ठ संताच्या उंच पदवीला कसा जाऊन पोहोचला, त्याचा भावनोत्कट इतिहास त्याच्या काव्यात सहजपणाने प्रकटला आहे. अशा ठिकाणी त्याची वाणी मेणाहून मऊ होऊन आपली अवघी आर्तता प्रकट करते; पण तत्कालीन पाखंडाचे, सामाजिक दंभाचे खंडन करताना तीच वज्राहून कठोर होते. अशा वेळी तिच्यात अतिशय सामर्थ्य उतरते, आवेश संचारतो, ती श्लीलाश्लीलांची किंवा ग्राम्याग्राम्यतेची पर्वा करीत नाही. तिला शस्त्राचे पाणी चढते. त्याचा जीवनाचा अनुभव अनेकांगी आणि व्यापक आहे. अनुभवांच्या संपूर्ण आकलनातून निर्माण होणाऱ्या सुभाषितवजा पंक्ती त्याच्या काव्यात ठिकठिकाणी अवतरतात. या आणि अशाच अनेक विशेषामुळे

तुकयाची मधुकविता
तरली पण इंद्रायणि

हे दिव्य घडले असावे.

वहिली – आधी.
पांजरा – अस्थिपंजर.
उदास – व्यर्थ.
बाथयाला – पोटाला.
साधन – कर्मकांड.

## रा म दा स

प्रपंच आणि परमार्थ यांचा सामर्थ्यपूर्ण पुरस्कार हा रामदासांच्या वाङ्मयाचा विशेष होय. ह्या दोन्हींची नेटकी साधना करण्यासाठीच विवेकवादाचा आणि प्रयत्नवादाचा पाठ दिला असावा. यामुळेच रामदासांच्या वाङ्मयाचे

स्वरूप कांही वेगळे झाले आहे. करुणाष्टकांसारख्या लेखनात साधी सरळ, शोकार्त रचना झाली असली, तरी एकंदरीने ओजोगुण हाच रामदासांच्या वाणीचा आवडता गुण. त्यांच्या सामर्थ्यपूजेला व ' उत्कट भव्य तेंचि घ्यावे । मिळमिळित अवघेचि टाकावे ' या ध्येयवादाला तो पोषकही ठरला आहे. काव्यसाधनेपेक्षा प्रचाराचीच रामदासांना अधिक तळमळ असल्याने अतिरिक्त तपशील, पुनरुक्ती, पाल्हाळ, अशुद्धता यांसारखे दोष त्यांच्या शैलीत आले असावे. तरीही रामदासांच्या निःशंक, निधड्या व्यक्तित्वाचे दर्शन घडविण्याचे बळ तिच्यात निश्चितच आहे.

वनारी – वनाचा शत्रु ( अशोकवनिका नष्ट केल्याचा संदर्भ ).
जगदांतर – जगाच्या अंतरी राहणारा.
पातालदेवताहंता – लंकेचा नाश करणारा.
नागरा – सुंदर.
ठकारणे – ठाण मांडून उभे राहणे.
मंद्राद्रीसारखा द्रोणू – समुद्रमंथनासाठी मंदर पर्वत पृथ्वीपासून उपटला होता, त्याप्रमाणे मारुतीने द्रोणागिरी ' क्रोधे उत्पाटिला '.
मनोगती – मनाच्या गतीने, त्वरेने.
वज्रपुच्छ – बळकट शेपूट.
शून्यमंडळ – आकाश.
संख्या चंद्रकळा गुणे – ( या स्तोत्रातील ) १६ श्लोकाच्या गुणांनी.
मंडणू – भूषण.

## वामनपंडित

वामनपंडिताच्या चरित्राविषयी फारच थोडी माहिती उपलब्ध असल्याने त्यासंबंधी वामन एक की अनेक, येथपासून वाद निर्माण झाले आहेत. त्यांचा निश्चित निर्णय अजूनही लागलेला नाही. तरीही 'यथार्थदीपिका'कार आणि रामायण-भागवतांतील अनेक आख्यानांवर सुश्लोकरचना करणारा कवी, हाच

प्रसिद्ध वामनपंडित असावा. याने लहान-मोठी अनेक वेदांतविषयक व आध्यात्मिक प्रकरणे लिहिली आहेत. 'यथार्थदीपिका' हा त्याचा या प्रकारचा प्रचंड ग्रंथ. यात त्याची विद्वत्ता, तर्कचिकित्सा, सूक्ष्म विवेचनपद्धती, आत्मविश्वास यांचे दर्शन होते. पण यात काव्यात्मता मात्र मुळीच नाही. ही उणीव त्याच्या राम-कृष्णकथांतील अनेक स्फुट प्रकरणांनी भरून काढली आहे. शृंगार, करुण, वत्सलरस यांचा उठाव, रेखीव स्वभावोक्तिपूर्ण वर्णने, विविध गेय वृत्तांची योजना अनुप्रास, यमकादि यांमुळे त्यात उतरणारे नादमाधुर्य इ. गुणांमुळे त्यांतल्य शृंगाराची उत्तानता किंवा भाषेची अशुद्धता यांसारख्या दोषांकडेही रसिकांनी दुर्लक्ष केले आहे.

रुक्मिणीने सुदेव ब्राह्मणाबरोबर कृष्णाला पाठविलेल्या पत्रातले हे काही श्लोक आहेत.

त्रिविध ताप – आध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक ताप.
विचक्षण – चतुर.
अंबुजाक्ष – कमलनयन.
जंबूक – कोल्हा.
चैद्य – चेदि-देशाचा राजा शिशुपाल.
अगण्य – अगणित, पुष्कळ.
नातळणें – स्पर्श न करणे.
अंबुधि – समुद्र.
निशाचर-विधि – राक्षसविवाहाचा विधी. ज्यात वधूपक्षाशी युद्ध करून वधूचे बळजबरीने हरण केले जाते, असा विवाहाचा एक प्रकार अर्थात 'राक्षसविवाह'.
शर्व – शंकर.
चरणारविंद – पदकमल.

## मोरोपंत

पंडितकवींत मोरोपंतांएवढे विपुल लेखन दुसऱ्या कोणत्याही कवीने केलेले नाही. रामायणकथा त्यांनी १०८ वेळा गाइली. भागवताच्या आधाराने

कृष्णविजय, मंत्रभागवत इत्यादि रचना केली, आणि आपल्या हातखंड्या आर्यावृत्तातून महाभारताचा मराठी अवतार पूर्णतेला नेला. नेमके कथाविवेदन, त्यातील संक्षेपविस्ताराची चतुरता, गतिमान संवादलेखन, त्यातून सहज स्वभावरेखन करण्याचे कौशल्य, संस्कृतप्राकृतमिश्रित भाषा, शब्दार्थालंकारांची विपुलता, अन्य पंडितकवींच्या तुलनेने व्याकरणशुद्ध रचना हे मोरोपंतांच्या लेखनाचे काही ठळक विशेष; आणि भगवद्भजन व कथानुरंजन ह्या दोन्हींचा संगम व्हावा, हा एकंदर साहित्यनिर्मितीमागील त्यांचा दृष्टिकोण होय.

द्रोणवधाने भयभीत झालेल्या आपल्या सैन्याला पुन्हा युद्धाला उद्युक्त करण्यासाठी दुर्योधनाने केलेले हे 'कर्णपर्वा'तील भाषण मोरोपंतांच्या लेखनाचे उचित प्रतिनिधित्व करील.

भुजबलाश्रये – बाहुबलाच्या आश्रयाने.
शुद्ध – निर्मळ.
विषण्ण – खिन्न.
प्रबुद्ध – जाणता.
चित्र – आश्चर्यकारक.
कुतूहल – कौतुक ( युद्धकौतुक ).
रामप्रसादलब्ध – परशुरामाच्या कृपेने मिळालेली.
अंगेन – अंगराज कर्ण ( इन = राजा ).
करिकुळ – हत्तींचा समुदाय.
हरि – सिंह.
भंगेना ? – भंगतेच.
रिपुमदमहिषशक्ति – शत्रूचा गर्व हाच महिष ( महिषासुर ), त्याला महाशक्ति ( भवानी ) प्रमाणे असलेला ( कर्ण ). भवानीने महिषासुराला मारले ही कथा येथे रूपकासाठी योजिली आहे.
मानुषयुद्धे – कोणतीही असामान्य दैवी शक्ती न वापरता केवळ मानवी शक्तीने केलेले युद्ध.
गजायुतबल – दहा हजार हत्तींची शक्ती असलेला.
त्या अवस्थेला – कठीण अवस्थेला.
गुरु – द्रोण.
मायावी – कपटी.
वासवशक्ति – इंद्राने (कर्णाला) दिलेली शक्ती.
खलबलजलधि – दुष्टांच्या सैन्याचा समुद्र.

संक्षुब्धौर्वानलदर्शन – प्रक्षुब्ध झालेल्या वडवाग्नीचे दर्शन. ( समुद्राच्या पोटांत वडवाग्नि असतो, अशी कल्पना आहे.)
द्रौणि – अश्वत्थामा, द्रोणपुत्र.
चापश्रुति – धनुर्वेद.
लघुतडागतोय – लहान तलावातील पाणी.
गुरुव्यसन – गुरूचा मृत्यू हेच मोठे संकट.
स-खेद-मना – दुःखी.

## श्री ध र

सर्वसामान्य प्रापंचिकाची नाडी ज्याने नेमकी ओळखली आणि त्यामुळे स्वाभाविकच ज्याची कविता लागलीच लोकप्रिय झाली, असा श्रीधर प्राचीन परंपरेतला कवी होय. कृष्ण, राम, शिव, पांडव इत्यादिकांची चरित्रे, त्यांतील क्रीडा-कौतुकांना उठाव देत, मोठ्या श्रद्धेने त्याने आपल्या 'हरिविजय', 'रामविजय', 'शिवलीलामृत', 'पांडवप्रताप' इत्यादि ग्रंथांतून गाइली आहेत. त्याच्या लेखनावर जवळजवळ अनुकरण म्हणावे, एवढा मुक्तेश्वराचा परिणाम आहे. त्याची शैली साधी पण गतिमान, आणि संयमपूर्ण पण सुस्पष्ट आहे. तीत कथानिवेदनाचे चातुर्य आहे, आणि जिव्हाळ्यातून सहजपणे निर्माण झालेला गोडवाही आहे. म्हणूनच श्रीधराचे काव्य वाचताना 'इक्षुदंडालाच शर्करेचे घड' आल्याचा आनंदानुभव येतो.

नुगवे – उलगडत नाहीत, उमगत नाहीत.
गीर्वाण – संस्कृत.
मुक्ताफळ – मोती.
मधुमक्षिका – मधमाशी.
सिकता – वाळू.
वोसंडावे – सोडून द्यावे.
तत्त्वता – खरोखर.
इक्षुदंड – ऊस.
सुवाड – मनोरम (सुहाड).

## केशवसुत [ कृष्णाजी केशव दामले ]

मराठी कवितेतील क्रांतीशी केशवसुतांचे नाव इतके निगडित झाले आहे की, केशवसुत म्हणताच प्रथम आठवते ती त्यानी मराठी कवितेत केलेली प्रचंड क्रांती. ‘ जुने जाउ द्या मरणालागुनि ’ ही या क्रांतीची प्रमुख घोषणा. ही घोषणा केवळ काव्यापुरती मर्यादित नसून तिचे स्वरूप जीवनव्यापी आहे. स्थितिशील जुन्या कल्पनांशी झगडताना केशवसुतांच्या वाणीला विलक्षण फुंद चढतो, वाणीला स्फुरण चढते. निशाण म्हणजे या स्फुरणाचे प्रतीकच. केशवसुतांसारख्या ‘ नव्या मनूंतिल नव्या दमाच्या शूर शिपाया’ने अशा निशाणाची प्रशंसा करावी, हे स्वाभाविकच नव्हे काय ?

पटखंड – कापडाचा तुकडा.
अवजार – शीड.
देवायतने – देवालये.
रंडागीत – रडगाणे, अतिहळवे काव्य.
साद घालणे – हाक देणे, बोलावणे.

## विनायक [ विनायक जनार्दन करंदीकर ]

‘ पूर्व दिव्य ज्यांचे त्याना रम्य भावि काळ ’ या दृष्टीने आदर्श ऐतिहासिक स्त्रीपुरुषांची चरित्रे गाणारा आधुनिक कविपंचकातील हा एक प्रमुख कवी. ज्या ऐतिहासिकतेवर आपला रागाभिमान पोसला, त्या अभिमानाची गौरवगाथा विनायकाच्या कवितेत पुन्हा-पुन्हा आढळते. केशवसुतांना समकालीन असलेला, एवढेच नव्हे, तर केशवसुतांचा निकट परिचय असलेला असा असूनसुद्धा विनायक यामुळेच केशवसुत-संप्रदायापासून वेगळा वाटतो. तथापि याच्याही मनावर झालेले आधुनिकतेचे संस्करण ‘ प्रीति निमाली तर–’ या सुनीतसदृश कवितेत आढळते. यातील प्रेमविषयक भावना निश्चितपणे आधुनिक वळणाची आहे.

विनायकाच्या कवितेच्या संदर्भात तर ती अपवादभूतच मानावयास हवी.

चेतोहर – चित्त हरण करणारे. दुर्धर – धरण्यास, आवरण्यास कठीण.
घन – दाट.

## गो विं दा ग्र ज [ राम गणेश गडकरी ]

कवी, नाटककार, विनोदीलेखक या तिन्ही नात्यांनी 'गोविंदाग्रजां'नी केलेली कामगिरी मराठी साहित्यात चिरस्थायी झाली आहे. कल्पनेचा उत्तुंग विलास व कुबेरालाही लाजविणारे भाषेचे वैभव या दोन गुणांच्या जोरावर मराठी रसिकांना त्यांनी काही काल अक्षरशः वेडे केले. कवितेच्या क्षेत्रात ते स्वतःला 'केशवसुतांचे चेले' व 'प्रेमाचे शाहीर' म्हणवून घेतात. केशवसुतांच्या कवितेशी तसे त्यांच्या कवितेचे विशेष साम्य नाही. परंतु 'प्रेमाचे शाहीर' ही पदवी मात्र बऱ्याच अंशांनी यथार्थ म्हणता येईल. प्रेमनिराशेतील दाहकतेचे वर्णन करताना गोविंदाग्रजांची भाषाशैली विलक्षण साधे, अनलंकृत रूप धारण करते. या शैलीत त्यानी इतर ज्या थोड्या कविता लिहिल्या आहेत, त्यांपैकीच 'एका जुन्या श्लोकाची आठवण' ही एक. तीतील कडवट निराशा व जीवनविषय उपरोध काळजाला भिडतो.

बहुसाळ – पुष्कळ, वारंवार. उपाधि – व्याप.

## बा ल क वी [ त्र्यंबक बापूजी ठोमरे ]

आधुनिक कविपंचकातील अत्यंत कोमल वृत्तीचा कवी. लहानपणी प्रसिद्धीस आल्याने त्याला 'बालकवी' ही पदवी प्राप्त झाली, आणि अकाली, अपघाती

निधनाने ती वज्रलेप झाली. विशुद्ध सौंदर्यदृष्टी, निसर्गावरील अनन्यश्रद्धा, सुकुमार भावना व लडिवाळ शब्दरचना हे बालकवींचे विशेष. 'तू तर चाफेकळी' या कवितेत त्यांचे हे सारे विशेष प्रकट झाले आहेत. बालकवीच्या या कवितेला 'भुलले तुजला हृदय साजणी' अशी शरणचिठी कोणीही रसिक आनंदाने देईल.

वनमाला – वन्य फुलांची माळ हा मूळ अर्थ; पण येथे वनमालेप्रमाणे सहजसुंदर असलेली बाला.

## चंद्रशेखर [चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे]

'जुन्या पंडिती युगाचे नवीन काळातील प्रतिनिधि' हे कविराज चंद्रशेखराचे बिरुद. केशवसुत, तांबे, रविकिरणमंडळ यांची कविता ज्या काळात गाजली, त्या साऱ्या काळात चंद्रशेखर काव्यलेखन करीतच होते. पण त्यांच्या कवितेची प्रकृती वेगळी होती. भावगीतरचनेपेक्षा प्रौढ, प्रदीर्घ रचनेकडेच त्यांचा विशेष कल. या त्यांच्या रचनापद्धतीमुळे त्यांचे नाते नव्यापेक्षा जुन्याशी अधिक जुळते. काव्य हे चंद्रशेखरांना यामुळे केवळ एक आविष्काराचे माध्यम न वाटता पवित्र व्रत वाटते. या व्रतस्थ शुचि मनानेच त्यांनी शारदेचे हे स्तोत्र गाइलेले आहे.

जातीचे सुमन – जाईचे फूल.
लोहातुल्य – लोखंडासारखे.
चुंबकगुण – लोहचुंबकाचा गुण.
यान – विमान.
आरोहणे – आरूढ होणे, चढणे.
नीड – घरटे.
काव्यामोद – काव्यानंद.
चौगुणी – चौपदरी.
ईप्सिते – मनातील उत्कट इच्छा.

## भास्कर रामचंद्र तांबे

तांबे यांचे ' आधुनिक कवींतील सर्वांत भाग्यशाली कवी ' असे प्रा. रा. श्री. जोग वर्णन करितात. दीर्घायुष्य, लोकमान्यता, कौटुंबिक स्वास्थ्य हे त्यांच्या भाग्यशाली जीवनाचे काही बाह्य पैलू. तांबे यांचे आंतरजीवनही असेच स्वास्थ्यपूर्ण व समृद्ध असल्यामुळे त्यांनी तृप्तमनाने विपुल व विविध रचना केली आहे. आत्मनिष्ठेइतकीच वस्तुनिष्ठा व अर्वाचीनांइतकेच प्राचीन संस्कार त्यांना प्रिय असल्यामुळे त्यांच्या कवितेला आधुनिक आणि अभिजात असे दुहेरी सौंदर्य प्राप्त झाले आहे. तांबे यांची कविता कौटुंबिक जिव्हाळा व खानदानी वळण यांमुळे एरव्ही भारदस्त व प्रौढ वाटली, तरी तीत पुष्कळदा मिस्कील विनोदी छटा मिसळलेल्या असतात. ' ये पहाटच्या तारा गगनी ' ही यांपैकी एक कविता.

तारस्वर – उंच स्वर.

निसुरडा – निर्लज्ज [ खुद्द कवीचीच टीप ].

## अनिल [ आत्माराम रावजी देशपांडे ]

' फुलवात ' या आपल्या पहिल्याच काव्यसंग्रहाने रसिकांचे लक्ष वेधून घेणारे कवी. फुलवातीचा मंद स्निग्धपणा त्यांच्या साऱ्याच प्रेमकवितांत आढळतो. केवळ आत्मनिष्ठ प्रेमगीतेच नव्हेत, तर सामाजिक जाणिवांनी युक्त व क्रांतीला पोषक ठरणारी कविताही अनिलांनी पुष्कळ लिहिली आहे. मुक्तच्छंदाचे जोरदार पुरस्कर्ते म्हणूनही अनिल विख्यात आहेत.

' फुलवात'पासून ' सांगाती'पर्यंतच्या चाळीस वर्षांहूनच्या अधिक काळात अनिलांची कविता अनेक प्रकारच्या स्थित्यंतरांतून गेलेली दिसते. या कालात

भोवतालच्या जीवनातही प्रचंड उलथापालथ झाली. अनेक बदल घडून आले. बदल झाला नाही तो अनिलांच्या प्रफुल्ल, जीवनासक्त रसील्या वृत्तीत. या वृत्तीला आलेले एक टपोरे रसरशीत फूल म्हणजेच 'चिरयौवन' ही कविता.

रोमहर्ष – हर्षाने आलेले रोमांच.
मधु – गोडी.
विवर्त – भोवरा.
प्रसाद – कृपा, अनुग्रह.
प्रलोभन – विशेष मोह.
मुमुक्षु – मोक्षाची इच्छा करणारा.

## माधव जूलियन [माधव त्र्यंबक पटवर्धन]

माधव जूलियन म्हणजे रविकिरणमंडळाचे 'रवि'. काव्याच्या क्षेत्रात त्यांनी चतुरस्र स्वरूपाची कामगिरी केली आहे. भावगीतांच्या जोडीने त्यानी खंड-काव्येही लिहिली आहेत. गज्जल, सुनीत यांसारख्या काव्यप्रकारांचे त्यांचे स्वतंत्र संग्रह आहेत. उपरोध-उपहासपर अशीही काही कविता त्यांनी लिहिली आहे. उमर खय्यामच्या रुबायांचा अनुवाद, फार्सी-मराठी कोश, छंदोरचना, भाषाशुद्धीची चळवळ हे त्यांच्या कर्तृत्वाचे आणखी काही पैलू. रचनाबंध कोणताही असो, त्यावर पांडित्याची छाया सातत्याने वावरत असल्याने त्यांना 'पंडितकवी' ही पदवी प्राप्त झाली.

परंतु 'सुखरूप आहे ना ग ?' ही त्यांची कविता त्यांच्या या नेहमीच्या रचनापद्धतीहून पूर्णतया वेगळी आहे. पंडित माधव जूलियनपेक्षा कुटुंबवत्सल माधवराव पटवर्धनांचे तीत घडणारे दर्शन विलक्षण विलोभनीय आहे.

## य श व न्त [ यशवन्त दिनकर पेण्ढरकर ]

माधव जूलियन हे रविकिरण मंडळाचे प्रमुख आधारस्तंभ असले, तरी मंडळातील सर्वांत लोकप्रिय कवी ‘ यशवन्त ’ हेच. त्यांना ही लोकप्रियता प्राप्त झाली, ती त्यांच्या रचनाप्रभुत्वामुळेच. प्रबल भावनांचा सहजोद्रेक हे भावगीताचे लक्षण यशवन्तांच्या रचनाशैलीला यथार्थपणे लागू पडते. ज्वलंत भावना व तिचा स्फोटक पण सौष्ठवपूर्ण आविष्कार यशवन्तांच्या काव्याइतका अन्यत्र क्वचितच दिसतो.

भावगीतरचनेसाठी विख्यात असलेल्या यशवन्तांनी काही खंडकाव्येही लिहिली आहेत. खंडकाव्य व भावगीतरचना यांचा एक नवाच मेळ त्यांच्या ‘ जयमंगला ’ या खंडकाव्यात घातला गेला आहे. ‘ विसङ्गतीतील गूढ ’ हे भावगीत याच खंडकाव्यातून निवडलेले आहे. एक कवी व एक राजकन्या यांच्या प्रेमाची कथा हा या खंडकाव्याचा विषय. कलंदर वृत्तीचा हा कवी बाह्यतः राजाच्या विनंतीला मान देऊन, पण वस्तुतः राजकन्येच्या रूपसौंदर्यावर मोहित होऊन राजदरबारात राहण्याचा निर्णय करतो, ही या भावगीताची पार्श्वभूमी.

अनुग्रह – कृपा.
कावा – डाव.
साळसूदपण – वरवरचा सज्जनपणा.
शारदीय ढग – शरद-ऋतूतील ढग; हे ढग कोरडे असतात. त्या संदर्भात निष्फळ कल्पना, असा येथे अर्थ सूचित करावयाचा आहे.
वाचा – शपथ.
स्रष्टा – निर्माता ब्रह्मदेव.
विधि – ब्रह्मदेव.
मणि – हेमलता.
मणि – रत्न.
हेम – सुवर्ण. रत्ने व सुवर्ण यांचे राजकन्येच्या रूपसौंदर्यात झालेले एकत्रीकरण येथे अभिप्रेत.

## के श व कु मा र [ प्रल्हाद केशव अत्रे ]

नाटक, कथा, कादंबरी, विनोदात्मक आणि आत्मचरित्रात्मक लेखन, व्यक्तिचित्रे इत्यादि अनेकविध वाङ्मयप्रकार प्र. के. अत्रे यांनी यशस्वितेने रचिले आहेत. त्यांच्या वृत्तीतली काव्यात्मता ' गीतगंगा ' या त्यांच्या संग्रहात उमटली आहे. पण त्यांच्या काव्यात्मतेला विनोदशीलतेचे पाणी चढून जेव्हा ती विडंबनात्मक स्वरूपात ' झेंडूच्या फुलां 'त उमटली, तेव्हा ती विलक्षण लोकप्रिय ठरली. विसंगती हा विनोदाचा आत्मा. ही विसंगती ' झेंडूची फुले ' या संग्रहात कधी उपहास, तर कधी अतिशयोक्ती, कुठे उपरोध तर कुठे विडंबन, केव्हा विशुद्ध नक्कल, तर केव्हा सूचक टीका अशा नानाविध रूपांनी प्रकट झाली आहे. आणि या साऱ्यांच्या पाठीमागे केशवकुमारांचे जीवनोत्सुक, खिलाडू, व्यक्तिमत्त्व सहानुभूतिशीलतेने हसत उभे आहे.

' कानगुजला ' या कवितेत स्त्रीच्या नटण्याच्या आवडीची अतिशय चुरचुरीत चेष्टा केली आहे. तिचा वैताग व्यक्त करण्यासाठी वापरलेल्या सांसारिक कल्पना विलक्षण नावीन्यपूर्ण आहेत.

कानगुजणे – कानांत सांगणे. 'कानगूज' या नामापासून तयार केलेला हा नामधातू प्रचारात नसताना तत्कालीन ' माधवी ' नावाच्या एका संकलित काव्यसंग्रहात तो वापरला गेला होता. त्याची ही हेतुपूर्वक नक्कल.

भिर्कावली – ' सर्दार ', ' हुर्हूर ' असे लेखन करणाऱ्या माधव जूलियन यांचे हे थट्टेखोर अनुकरण.

## रा. श्री. जो ग

समतोल वृत्तीचे साहित्यसमीक्षक म्हणून प्रा. रा. श्री. जोग प्रसिद्ध आहेत. ' आधुनिक काव्यप्रकाश ', ' सौंदर्यशोध आणि आनंदबोध ', ' केशवसुत ',

'मराठी वाङ्मयाभिरुचीचे विहंगमावलोकन' इत्यादि ग्रंथांवरून त्यांची ही प्रसिद्धी यथार्थ असल्याचेही पटते. पण आरंभकालांत जोगांनी लिहिलेली कविता चोखंदळ रसिक विसरणार नाहीत. 'निशागीत', 'ज्योत्स्नागीत' या चिमुकल्या संग्रहात प्रेमाची भावना अनलंकृतपणाने पण सहज उत्कटतेने प्रकट झाली आहे. विनोदपूर्ण काव्य जोगांनी अगदीच मोजके लिहिले असावे. 'पहिले काव्यगायन' हीच त्यांची अशा प्रकारची विशेष लोकप्रिय कविता. तीतून प्रकट होणारे जोगांचे सूक्ष्म निरीक्षण आणि मिस्कील, प्रसन्न व्यक्तिमत्त्व आकर्षक आहे.

शीर हे सलामत ... हजार – 'शिर सलामत, तो पगडी पचास' या म्हणीचा सहेतुक उपयोग.

नसे काय विपुला...अपार – 'कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी' हे भवभूतीचे वचन प्रसिद्ध आहे. काल अनंत आणि पृथ्वी विशाल असल्यामुळे कोठे-ना-कोठे आणि केव्हा तरी आपल्या वृत्तीचे महत्त्व जाणणारा समानधर्मा रसिक मिळेलच. असा त्याचा आशय. मूळच्या आत्मविश्वासाला येथे पोकळ ऐटीचे रूप येते आणि विनोद निर्माण होतो.

## बा. भ. बोरकर

'प्रतिभा', 'जीवनसंगीत', 'दूधसागर', 'आनंदभैरवी', 'चित्रवीणा' इत्यादि काव्यसंग्रहांचे कर्ते. ('बोरकरांची कविता' या नावाने त्यांची बहुतेक कविता आता संग्रहीत झाली आहे.) बोरकरांनी काही गद्यलेखनही केले असले, तरी त्यांचे प्रभावी आविष्कारमाध्यम काव्यच. १९३७ साली 'जीवनसंगीत' हा त्यांचा पहिला महत्त्वाचा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. तेव्हा गोमंतक प्रदेशाची वैशिष्ट्ये प्रकट करणारा व कविवर्य तांबे यांची परंपरा पुढे चालविणारा कवी

म्हणून त्यांचा बोलाबाला झाला. आज त्यांचा गौरव होत आहे, तो स्वतंत्र प्रतिभेचा एक रससिद्ध कवी म्हणून.

निसर्ग व प्रेम यांच्या द्वारा बोरकरांची कविता जीवनाचे श्रेय शोधीत असते. या शोधात तिला पुष्कळदा संतांच्या पावन संस्काराचा आश्रय घ्यावासा वाटतो. संतसाहित्याशी असलेल्या या ऋणानुबंधामुळेच 'ज्ञानदेव गेले तेव्हा' ही कविता बोरकर लिहू शकले. ज्ञानदेवांच्या समाधिप्रसंगावर आधारलेली ही कविता वाचताना संत नामदेवाने या प्रसंगाचे केलेले हृदयद्रावक वर्णन हटकून आठवते.

रानभरी – रानोमाळ.
निवृत्ति – निवृत्तिनाथ, ज्ञानदेवाचे गुरू व वडील बंधू.
बापरखुमादेवीवरू – विठ्ठलरखुमाईला उद्देशून ज्ञानदेवांनी आपल्या अंभगांतून वापरलेले संबोधन.
नामा – संत नामदेव.
बावला मोगरा – बावला, कोमेजला. 'मोगरा फुलला' या ज्ञानदेवांच्या अभंगातील आनंदमय स्थितीच्या उलट स्थिती येणे हे कवील येथे अभिप्रेत आहे.

## कुसुमाग्रज [ विष्णु वामन शिरवाडकर ]

'जीवनलहरी', 'विशाखा', 'किनारा', 'मराठी माती', 'स्वगत' हे कुसुमाग्रजांचे काव्यसंग्रह, 'गोविंदाग्रजां'प्रमाणे 'कुसुमाग्रज' हे कवी व नाटककार या दोन्ही नात्यांनी महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. गोविंदाग्रजांनाही भाषेचे वैभव व कल्पनेचे दैवी लेणे प्राप्त झाले आहे. त्याचे ऐश्वर्यशाली दर्शन त्यांच्या शैलीत घडते. अन्यायाची उफाळून येणारी चीड व तिचा त्वेषपूर्ण आविष्कार हे कुसुमाग्रजांच्या कवितेचे स्थायी भाव. हा भाव किती उद्दामपणे

प्रकट होतो ते ' हिमलाट ' या कवितेवरून दिसेल. कुसुमाग्रजांच्या ' अग्निसंप्रदायी ' कवितांच्या प्रभावळींत शोभण्याजोगीच ही कविता आहे.

धरा – पृथ्वी.
खोप – झोपडी.
दुलई – ऊबदार, मऊ पांघरूण.
लाव – मुले खाणारी राक्षसीण.

## वा. रा. कान्त

' फटत्कार ', ' पहाटतारा ', ' रुद्रवीणा ', ' वेलांटी ' हे स्फुट काव्यसंग्रह, ' अग्निपथ ' व ' आशिया ' ही खंडकाव्ये व ' शततारका ' नावाचा रुबायांचा संग्रह कान्तांच्या नावावर जमा आहे. वेच्छूट वृत्ती हा त्यांच्या काव्याचा एक महत्त्वाचा घटक असला, तरी अन्यायाची चीड प्रकट करणारी कविताही त्यांनी बरीच लिहिली आहे. ' रुद्रवीणा ' या नावातील दुहेरीपण ( रुद्रत्व व कोमलत्व ) त्यांच्या साऱ्याच कवितेत अभिप्रेत आहे. ओजाइतकेच मदिर शृंगाराचेही कान्तांना आकर्षण आहे.

या शृंगाराचीच एक सांद्र छटा, घनदाट रेशमी केशकलाप उदविणाऱ्या मदालसेच्या चित्रणात उमटलेली दिसेल.

कचभार – केशकलाप.
कृष्णसघन – काळा व दाट.

## इंदिरा [ इंदिरा संत ]

आधुनिक कवियित्रींतील प्रमुख कवियित्री. इंदिराबाईंचा ' सहवास ' हा काव्यसंग्रह १९४१-मध्ये प्रसिद्ध झाला. त्यानंतर गेल्या वीस-बावीस वर्षांत यशाचा चढता-वाढता क्रम दाखविणारे ' शेला ', ' मेंदी ', ' मृगजळ ' हे

त्यांचे आणखी काही संग्रह प्रसिद्ध झाले. या काळात मराठी कवितेत व जीवनात खूप बदल झाला. परंतु इंदिराबाईंच्या भावविश्वाला त्याचा धक्का लागलेला नाही. सुखदु:खांच्या विविध अनुभूतींनी अंतर्मुख होणारी निखळ भावना व तिचा अचूक आविष्कार ही इंदिराबाईंची वैशिष्ट्ये. या भावविश्वात निसर्ग आणि मानव या दोनच सनातन घटकांना महत्त्व असते. निसर्ग आणि प्रेम यांच्या मुलायम मिश्रणाने ' शेला ' कविता सिद्ध झाली आहे. तीतील रंग, पोत व विणकामाची कुसर कोणाचेही चित्त आकृष्ट करून घेईल, अशीच आहे.

निर्भर – पूर्ण, गाढ.
धूसर – अस्पष्ट, अंधूक.
चारुदत्त-वसंतसेना – शूद्रकाच्या 'मृच्छकटिक' नाटकातील नायक-नायिका. कवयित्रीने निसर्गाच्या संदर्भात त्यांचा केलेला उपयोग लक्षणीय आहे.

## वा. सी. मर्ढेकर

'नवकाव्याचे प्रमुख प्रवर्तक' हे मर्ढेकरांचे सार्थ वर्णन. त्यामुळेच त्यांना कठोर टीका सहन करावी लागली. आशय, कल्पना, प्रतिभा, शैली, यांसारख्या साऱ्याच काव्यांगांत मर्ढेकरांनी धक्का देणारे परिवर्तन घडवून आणले आहे. त्यांची सौंदर्यदृष्टी अतिशय तरल आहे. आणि म्हणूनच आजच्या जीवनाच्या विरूपतेचा त्यांना उबग येतो: कित्येक वेळा हा उबगच विडंबनाचे रूप घेऊन त्यांच्या कवितेत उतरतो. यांत्रिकतेच्या विलक्षण वर्चस्वामुळे दडपून गेलेल्या हतबल मानवाची विफलता त्यांच्या कवितेने वारंवार वर्णिली आहे. जिवंत आशावादही त्यांनी गाइला नाही, असे नाही. त्यांची रचना आपल्या आत्यंतिक वेगळेपणामुळे तऱ्हेवाईक, विक्षिप्तसुद्धा वाटते. तिच्यात दुर्बोधताही आहे. आणि तरीही ती अत्यंत प्रभावी आहे.

आजच्या कृत्रिम जीवनात सहजसुंदर आनंदही दुर्मीळ झालेला आहे. त्या सहजसुंदरतेचीही भीति वाटावी आणि कृत्रिमतेलाच बरे म्हणण्याची पाळी यावी, ही आपली आजची स्थिती. ही कविता म्हणजे यावर केलेली सूचक टीका होय.

ऋचा – ऋग्वेदातील मंत्र.

REFBK 0014059

REFBK-0014059

## वि. म. कुलकर्णी

वि. म. कुलकर्णी यांनी बरेच विविध लेखन केले आहे. 'आहुति' ही कादंबरी व 'न्याहरी' हा कथासंग्रह त्यांचा ग्रामीण जीवनाबद्दलचा जिव्हाळा प्रकट करितात. तथापि कुलकर्णी मुख्यतः मान्यता पावलेले आहेत, ते कवी म्हणून. 'विसर्जन', 'पहाटवारा', 'कमळवेल', 'आश्विनी' हे त्यांचे प्रमुख काव्यसंग्रह. यांखेरीज त्यांची काही बालगीतेही प्रसिद्ध आहेत. जीवनातील विविध पातळीवरच्या व्यक्तींशी वा घटनांशी सहृदयतेने समरस होण्याचा त्यांचा गुण त्यांच्या सर्वच लेखनात आढळतो. 'मोहोळ' हा ते काव्यविषय बनवू शकले, याचे कारण हेच.

## कृ. ब. निकुम्ब

'उज्ज्वला', 'ऊर्मिला' व 'सायसाखर' (बालगीतसंग्रह) एवढे तीनच मोजके काव्यसंग्रह निकुम्बांनी प्रसिद्ध केलेले असले, तरी चोखंदळ दृष्टी, सापेक्षी रचना व प्रौढगंभीर जीवनदर्शन यांमुळे आरंभापासूनच निकुम्बांची कविता रसिकमान्य झाली आहे. जीवनाच्या उदात्त करुण अंगाकडे निकुम्बांचा ओढा

असल्यामुळे त्यांची कविता वाचकाला अंतर्मुख बनविते, संस्कारित करते. ' स्नेह मी जागवीन आपुला ' ही कविता या दृष्टीने पहावी.

उलणे – दुभंगून जाणे.
मंडले – गोलाकार गिरक्या.
मंत्रावली – मंत्राचा पुन्हा-पुन्हा होणारा घोष.

## मंगेश पाडगावकर

' धारानृत्य ', ' जिप्सी ', ' छोरी ', ' उत्सव ' इत्यादि विविध काव्यसंग्रहांचे कवी व आजच्या नवकवींतील प्रमुख कवी; निसर्गसौंदर्याशी व त्याच्या चैतन्यपूर्ण गूढ विलसिताशी एकरूप होणे हा त्यांच्या प्रतिभेचा आवडता छंद. या बाबतीत पुष्कळदा ते बालकवींची आठवण करून देतात. पाडगावकरांच्या रचनाशैलीचा तरलपणाही बालकवींच्या धाटणीचा. सृष्टीत विस्मयचकित करणाऱ्या अनंत रूपांतील रस, रंग, गंध, टिपण्याच्या कौतुकवृत्तीतून ' पहिल्या हिरव्या तृणपात्या'च्या सत्काराला ते सज्ज झाले आहेत.

ललकार – उंच स्वरात केलेला पुकार.
नचिकेताचे स्वप्न – मृत्यूचे रहस्य जाणून घेण्याची नचिकेताची इच्छा व त्याने यमराजाशी केलेला संवाद ' कठोपनिषदा'त आला आहे. हे रहस्य जाणून घेण्याची इच्छा हेच नचिकेताचे स्वप्न.
सृजन – नवनिर्मिती.

## वसंत बापट

खेळकर, खोडकर प्रेमाच्या बऱ्याच कविता अलीकडे बापटांनी लिहिलेल्या असल्या, तरी त्यांची प्रसिद्धि आहे, ती शाहिरी वळणाची जडणघडण

असलेली कविता लिहिण्याबद्दल. त्यांच्या पहिल्या कवितासंग्रहाचे नाव 'बिजली'. 'बापटांच्या कवितेत बिजली'चा कडकडाट व तेजाळपणा अवतरला आहे. मराठी भाषा, संस्कृती व इतिहास यांचे सामग्र्याने ओजस्वी दर्शन घडविणारी 'सह्यकडा' यासारखी पल्लेदार कविता यामुळेच ते लिहू शकले.

कातळ – खडक.

मधुगुंजन – गोड गीत.

खड्गकळा – तरवारीचे तेज.

कबीर, तुळशी – प्रसिद्ध उत्तर-भारतीय संत.

जयदेव – 'गीतगोविंद' या ललित-मधुर संस्कृत काव्याचा लेखक.

नामा – नामदेव.

एका – एकनाथ.

चोखा – चोखामेळा.

जनकोजी– जनकोजी शिंदे. पानिपतच्या युद्धातील प्रसिद्ध तरुण योद्धा.

दत्ताजी – दत्ताजी शिंदे. पानिपतच्या युद्धातील आणखी एक प्रसिद्ध योद्धा.

बाच जायें तो और लढें – 'बचेंगे तो और भी लढेंगे' हे दत्ताजी शिंद्याचे युद्धातील तेजस्वी उद्गार.

ख्यालतराणे – अभिजात उस्तादी गायनाचे विशिष्ट प्रकार.

होनाजी – शाहीर होनाजी बाळा.

औट हात – साडेतीन हात.

REFBK-0014059

REFBK-0014059